नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाच्या अनुदानाने प्रकाशित विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

फेब्रुवारी—मार्च १९७५

माघ–फाल्गुन शके १८९६

संपादक : डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर
कार्यकारी संपादक वसंत खेरडीकर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर ग्रंथ संग्रह

विदर्भ साहित्य संमेलनाच्या ३१ व्या अधिवेशनाचे अध्यक्षपद प्रा. शरच्चंद्र टोंगो भूषविणार आहेत हे कळताच कुणीतरी म्हणाले,

–" हे तेच काहो, 'शोभना देशपांडे' या नावाने बऱ्याच वर्षांपूर्वी कथालेखन करणारे ?"

–हो. तेच प्रा. शरच्चंद्र टोंगो–यवतमाळचे सुप्रसिद्ध साहित्यिक. प्रा. शरच्चंद्र तथा बबनराव टोंगो–!

कर्तृत्व आहे पण अहंकाराचा लवलेशही नाही; कला आहे पण जी विनयाच्या कोंदणात आहे; साहित्यिक अधिकार आहे पण स्वार्थ नाही, असा हा निरिच्छ व साधा, सात्विक आणि तरीही असामान्य असा वैदर्भीय साहित्यक आहे.

श्री. टोंगो यांनी आतापर्यंत विपुल साहित्यलेखन केलेले आहे आणि अजूनही ते सातत्याने लिहित आहेतच. 'स्वीकार'पासून 'ही काही माणसं'पर्यंत अकरा कादंबऱ्या, 'पेशावरचा चाकू' हा कथासंग्रह, 'नव्या डहाळ्या नवे खोपे' आणि 'तिसरे राज्य' ही नाटके, लहान मुलांसाठी 'कुमार', 'झेलम' आणि 'गणगोत' ह्या कादंबऱ्या; 'गारव्यातील मुलाखती' व 'समशेरीचं पाणी' ह्या ढंगदार आणि वैशिष्टपूर्ण शैलीतील पुस्तिका, याशिवाय कितीतरी कथा असे सर्व मिळून सुमारे तीन हजार पृष्ठांपेक्षाही अधिक असे प्रकाशित साहित्य त्यांचे नावे आज जमा आहे. त्यांचे नाटयलेखन पाहून असे वाटावे की हा माणूस मनावर घेईल तर व्यावसायिक रंगभूमी गाजविणारी नाटके समर्थपणे लिहू शकेल. त्यांच्या बालवाङमयाच्या किती आवृत्या निघाल्या हे ढवळे प्रकाशनालाच माहित ! त्याचा हिशोब टोंगो यांच्या जवळ नाही, हे त्या पुस्तकांच्या यशाचे गमक नव्हे काय ?

विचारांची एकनिष्ठता ठेऊन टोंगो यांनी आपल्या प्रतिभावान कलेचा उपयोग केला आहे. सहजतेतही वास्तविक जीवनार्थ उलगडून दाखविणारी मानवी संवेदनेची सजीव अभिव्यक्ती त्यांच्या साहित्यात प्रकर्षाने जाणवते. दुर्दम्य आशावाद, अकुंठित जीवनप्रेम, नैतिकता आणि वैचारिक संघर्षाचे एकनिष्ठ प्रतिबिंब, हे त्यांच्या अभिजात लेखनाचे वैशिष्टच आहे. त्यांचे लेखन सर्वांगीण आणि सर्वस्पर्शी आहे. कथानकातल्या वाक्या–वाक्यातून

[मलपृष्ठ ३ वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाच्या अनुदानाने प्रकाशित विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक : मधुकर रघुनाथ आष्टीकर

संपादक-मंडळ : डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, प्रा. सुरेश म. डोळके, प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. म. शं. वावगावकर, प्रा. भी. रा. जहागीरदार, प्रा. यशवंत मनोहर.

निवड–उपसमित्यांचे सदस्य

कविता प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. या. मु. पाठक, प्रा. सौ. उषा लिमये, श्री. मनोहर चिंतामणि वझे ✽ **समीक्षा व ग्रंथपरीक्षण :** प्रा. म. शं. वावगावकर, प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. मधुकर आष्टीकर, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. भा. श्री. परांजपे ✽ **संशोधन :** डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, प्रा. सुरेश म. डोळके, डॉ. ना. कृ. शनवारे, प्रा. म. रा. जोशी ✽ **ललित लेखन** प्रा. यशवंत मनोहर, प्रा. सौ. शकुंतला खोत, प्रा. तारा शास्त्री, प्रा. म. ना. लोही, प्रा. भी. रा. जहागीरदार.

अनुक्रमणिका

लेख / होळकर वंशनामावर नवा प्रकाश म. शं. वावगावकर ३७१, दासोपंतांच्या गीताटीका : मधुकर रामदास जोशी ३७३, मराठी लेखिकांचे अलिकडचे नाटयलेखन : शकुंतला खोत ३८१, भाऊसाहेबांची बखर : उषा मा. देशमुख ३८६, बालकवी–एक आकलन : सुशीला पाटील ३९०, **ललित लेख** / वाहने आणि मी : कुंदा पारसनीस ३७५, जीवनगाणे : संजीवनी देशमुख ३७८, **कविता** / वेदनांच्या आज माझ्या यादव मुकुंद पाठक ३८३ पिलूं ' म. म. देशपांडे ३८३, सपन : सुधाकर गायधनी ३८४, उंटासारखे खूप करून घेतले / डोळ्यांच्या वाटेने घडतो प्रवास : रंगनाथ कुळकर्णी ३८४, वैभव...? : कु. 'नीर' चांदूरकर ३८४, काळा कातळ : शिरीष गोपाळ देशपांडे ३८५, शून्यत्वाची थंडगार वेदना : राम गोसावी ३८५, माणसाच्या दुनियेमध्ये / भोगपुरुषांची जमात : शशी दाभोळकर ३८५, **कार्यवृत्त विभाग** / एक्कावन ते पंचावन्न.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झाशीराणी चौक, नागपूर–१२.

मुद्रक : म. पां. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर–१२.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

'होळकर' वंशनामावर नवा प्रकाश

म. शं. वाबगावकर,

इंदूरचे होळकर राजघराणे हे मराठेशाहीतील सुप्रसिद्ध राजघराण्यांपैकी एक. पहिल्या बाजीराव पेशव्याने शिंदे होळकरांना हाताशी धरून उत्कर्षास चढविले. होळकर हे वंशनाम 'होळ' ह्या ग्रामनामावरून पडले असल्याचे सांगितले जाते. 'होळ' नावाची महाराष्ट्रात तीन गावे आहेत. एक पुणे जिल्ह्याच्या भीमथडी तालुक्यात, दुसरे बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यात व तिसरे सातारा जिल्ह्याच्या फलटण तालुक्यात. पैकी पुणे जिल्ह्यातील नीरेकाठच्या जेजुरीजवळील होळ (मुरूम) येथे इ स. १६९३ मध्ये ह्या राजवंशाचे मूळ पुरुष मल्हारराव ह्यांचा जन्म झाल्याने ह्या वंशास होळकर नाव पडले असे मानले जाते. तथापि ही व्युत्पत्ती काल्पनिक दिसते. प्राचीन काळी 'औलिकर' नावाचा जो प्रसिद्ध राजवंश माळव्यात होऊन गेला त्याचे वंशज होळकर असून 'औलिकर'चेच अपभ्रष्ट रूप 'होळकर' झाले असावे.

श्री. मु. म. अत्रे ह्यांनी लिहिलेले 'थोरले मल्हारराव होळकर यांचे चरित्र' इ. स. १८९३ साली प्रसिद्ध झाले. त्यात मल्हाररावांचा जन्म खानदेशात होळ गावी झाला असे म्हटले आहे (मराठी साहित्य समालोचन, खंड तिसरा, चरित्र, वि. सी सरवटे, महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर, १९६९, पृ. ७१) काव्येतिहाससंग्रह, इतर लेखसंग्रह व अनेक इंग्रजी मराठी ग्रंथांच्या आधाराने परिश्रमाने लिहिलेले हे चरित्र आहे. मल्हारराव तीन वर्षांचे असताना त्यांचे वडील खंडूजी निवर्तले; तेव्हा त्यांची आई त्यांना घेऊन (खानदेशात) तळोद्यास आपला भाऊ भोजराज ह्याजकडे आली असे मल्हाररावांच्या चरित्रात नमूद आहे. यावरून औलिकर वंशीय मंडळी माळव्यातून खानदेशमार्गे दक्षिणेत उतरली असावी.

हूणविजेता सुप्रसिद्ध यशोधर्मन् विष्णुवर्धन हा औलिकरवंशीय होता. ह्याची राजधानी दशपुर. पुढे उज्जयिनी जिंकून ती त्याने राजधानी केली. आदित्यवर्धनाचा पुत्र द्रव्यवर्धन व त्याचा यशोधर्मन् विष्णुवर्धन गुप्तकालीन प्रसिद्ध गणिती व ज्योतिषी वराहमिहिर ह्याने आपला पंचसिद्धांतिका ग्रंथ शके ४२७ म्हणजे इ स. ५०५ मध्ये लिहिल्याचा त्या ग्रंथातच उल्लेख आहे. त्याने महाराजाधिराज द्रव्यवर्धनाचा शकुनविषयक व ज्योतिषविषयक ग्रंथ पाहिला होता. म्हणजे द्रव्यवर्धन हा वराहमिहिराचा पूर्ववर्ती होय.

माळव्यात मंदसोर येथे एका विहिरीला लावलेल्या शिलेवर यशोधर्म्याच्या काळचा एक शिलालेख मिळाला आहे. त्यात त्याचे दुसरे नाव विष्णुवर्धन व त्याच्या वंशाचे नाव औलिकर असे येते; त्याच्या 'राजाधिराज' व 'परमेश्वर' ह्या सम्राट्पदनिदर्शक पदव्याही येतात. ह्या शिलालेखाचा काळ मालवसंवत् ५८९ म्हणजे इ. स. ५३३/५३४ हा होय माळव्यातील विहारकोत्रा गावी इ. स. १९३८ मध्ये मालवसंवत् ४७४ मधील महाराज नरवर्मन् नृपतीचा शिलालेख सापडला.(Epigraphia Indica, vol. 26, p. 131); त्यात 'श्रीमहाराज नरवर्मण: औलिकरस्य राज्यसंवत्सरे' असा निर्देश आहे. ह्याच नरवर्म्याच्या वंशजांचे काही लेख मंदसोरच्या सभोवारच्या प्रदेशात सापडले आहेत. म्हणजे हे घराणे मंदसोरला दीर्घकाळ राज्य करीत होते. त्यातच पुढे यशोधर्मन् विष्णुवर्धन झाला.

हूणनृपति तोरमाण ह्याचा पुत्र मिहिरकुल हा शिवोपासक होता. त्याची राजधानी पंजाबात शाकल (हल्लीचे सियालकोट) व काश्मीर त्याच्या ताब्यात होते असे ह्यूएनत्संग लिहितो. पुढे ह्यूएनत्संगाने असेही लिहिले आहे की ह्या मिहिरकुलाने पेशावरचे भगवान् बुद्धांचे भिक्षापात्र भग्न केले; आपल्या राज्यातील १६०० स्तूप व विहार नष्ट केले व ९ कोटि बौद्धांना कंठस्नान घातले. मिहिरकुलकृत अत्याचारांचे ह्यूएनत्संगकृत हे वर्णन अतिशयोक्त असावे. औलिकर यशोधर्मन् विष्णुवर्धन ह्याने इ. स. ५३३/५३४ च्या सुमारास ह्या अत्याचारी मिहिरकुल हूणावर महान् विजय मिळविला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्रातील आजची अनेक आडनावे इतिहासकालातील राजवंशनामांपासून झालेली आहेत. जसे—मौर्य > मोरे, मानांक > माने, कदंब > कदम, चाहमाण > चव्हाण, चालुक्य > सोळंखी, शिलाहार > शेलार, परमार > पवार, राष्ट्रकूट > राठोड, यादव > जाधव, सेंद्रक > सिंदे शिंदे इ. त्याचप्रमाणे होळकर हे आडनाव देखील 'औलिकर' ह्या जुन्या राजवंशाचे वाचक होय. आश्चर्याची गोष्ट अशी की ज्याप्रमाणे माळव्यातील परमारकुलाच्या प्रदेशात त्यांचे वंशज असलेल्या पवारांचे राज्य धार व देवास येथे पुढे स्थापन झाले त्याप्रमाणे माळव्यातील ज्या टापूत 'औलिकर' वंशाचे राज्य होते त्याच टापूत पुढे त्यांचे वंशज असलेल्या होळकरांचे राज्य स्थापन झाले. औलिकर व होळकर ह्यांचा शासन प्रदेश एकच असावा हा ऐतिहासिक योगायोगही ह्या उभय वंशांची एकात्मता ध्वनित करतो.

कालिदासाने रघुवंशात आरंभीच 'क्व सूर्यप्रभवो वंश: क्व चाल्पविषया मति:। तितीर्षुर्दुस्तरं मोहात् उडुपेनास्मि सागरम् ॥' म्हणजे 'सूर्यापासून उत्पन्न झालेला तो वंश कुठे व माझी अल्पविषया मति कुठे ? पण केवळ मोहामुळे लहानशा होडग्यातून हा दुस्तर सागर तरून जाण्याची इच्छा मी करीत आहे', असे म्हटले आहे. येथील उडुप शब्दापासून मराठीत होडकं, होडगं शब्द बनले तसेच 'औलिकर'चे होळकर झाले आहे हे उघड आहे.

होळकरांचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा. (त्याअर्थी मल्हाररावांचे जन्मस्थळ खानदेशातले होळ नमून पुणे जिल्ह्यातील जेजुरीपासचे होळ हे असणे अधिक संभवते.) खंडोबा हा मूलत: स्कंद होय हे ऑप्टने दर्शविले आहेच. अश्ववाहन मल्हारीचे आयुध खड्ग व मल्लासुराचा म्हणजे पर्वतेयाचा नाश करणारा हा देव इंद्र असला पाहिजे असे श्री. शं. बा. जोशी यांचे मत आहे. 'मल्हारी मार्तण्ड' अभिधानावरून त्यात सूर्योपासनेचाही भाग दिसतो. मल्हारीच्या निरनिराळ्या मूर्तींचे निरीक्षण करता त्यात शिव, भैरव व आदित्य ह्या तीन देवतांचे एकरूपत्व प्रतीत होते. तथापि ऑप्टने दर्शविल्याप्रमाणे मूलत: तो स्कंद कार्तिकेय म्हणजे शिवाचीच विभूती अथवा शिवच होय. औलिकर ह्यांही शिवोपासक राजवंश असल्याने हीही संगती जुळते.

होळकर हे खुटेकर धनगर आणि औलिकर हे क्षत्रिय तेव्हा ह्या दोहोंचे एकवंशीयत्व कसे संभवते अशी शंका ह्यावर उपस्थित होऊ शकते परंतु धनगरादी पशुपालन करणाऱ्या जाती मूलत: क्षत्रियच होत. ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणातील शुन:शेप आख्यानांतर्गत इतिहासावरून हे दिसते. ऐतरेय ब्राह्मणातील शुन:शेपाची ही कथा थोड्याफार फरकाने महाभारत (अनुशासनपर्व ३, शांतिपर्व २९४), देवी भागवत (७·१४ ते १७), भागवत (९·७; १६), वाल्मीकिरामायण (बालकांड ६१–६२), हरिवंश (१२७), विष्णुपुराण (४७), ब्रह्मपुराण (१०) इत्यादी ठिकाणी आलेली आहे. शुन:शेप हा सूक्तद्रष्टा आहे (ऋग्वेद १·२४·१३–१४). ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणे हरिश्चंद्र राजाला मुलगा होईना म्हणून त्याने वरुणाला मला मुलगा झाल्यास तो तुला बळी देईन असा नवस केला. पण पुढे मुलगा झाल्यावर तो नवस फेडणे लांबणीवर टाकू लागला. मुलगा रोहित ह्याला हे कळू लागल्यावर तो ह्या भयाने घरातून पळून गेला. हरिश्चंद्राला उदर रोग जडला. रोहिताने शुन:शेपाला वरुणास बळी देण्यासाठी अजीगर्ताकडून विकत घेतले. वरुणाप्रीत्यर्थ बळी देण्यासाठी शुन:शेपाला यज्ञस्तंभास बांधले असता विश्वामित्राने त्याला सोडवून आपला पुत्र मानले व त्याचे देवरात नाव ठेविले. विश्वामित्र याचा मामा असून हरिश्चंद्राच्या यज्ञात अध्वर्यू होता (ऐ. ब्रा. ७·३; सांख्यायन श्रौतसूत्र १५·२०–२१; १६·११·२). मंत्रप्रभावाने ह्याची सुटका होऊन हरिश्चंद्राचे पोट ओसरले. याला पाशमुक्त केल्याचा निर्देश या सूक्ताखेरीज अग्नीच्या स्तुतीत आला आहे (ऋग्वेद ५.२.७ सायणभाष्य). नंतर ह्याला ज्येष्ठपणाचा मान देण्यास आपल्या मुलांना विश्वामित्राने सांगितले असता मधल्या मधुच्छंदसापासून वडील पन्नास मुलांनी ते नाकारल्याने विश्वामित्राने त्यांना शाप दिला की तुम्ही वर्णभ्रष्ट होऊन पुण्ड्र, शवर, पुलिन्द, मूतिब इत्यादी व्हाल व ते तसे बनले (ऐतरेय ब्राह्मण ७.१८). तात्पर्य, पुण्ड्र, शवर, पुलिन्द, मूतिब, धनगर इत्यादी ह्या वन्य जाती मूलत: क्षत्रियवर्णोद्भव आहेत असा हा इतिहास ऐतरेय ब्राह्मणात स्पष्ट आहे.

पूर्वकाळी युद्ध करण्याचे काम केवळ क्षत्रियांचे असे. वारंवार येणाऱ्या आक्रमकांशी लढून लढून शुद्ध क्षत्रिय

[पृष्ठ ३७६ वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दासोपंतांच्या गीताटीका

मधुकर रामदास जोशी

इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धातील अंबाजोगाईच्या दासोपंतांनी भगवद्गीतेवर टीका लिहिलेल्या आहेत. त्यांच्या गीताटीका अति विस्तृत असून त्यांनी पूर्वसूरींच्या गीताटीकेपेक्षा वेगळी भूमिक स्वीकारलेली आहे. महाराष्ट्र सारस्वतकार भाव्यांच्या मते त्यांनी एकट्या गीतेवरच पाच–सहा टीका लिहिल्या आहेत. मात्र त्यांनी दासोपंतांच्या गीतार्थबोधचंद्रिका व गीतार्णव या दोन टीकेचाच उल्लेख केला आहे. पुरवणीकार डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी गीतार्णव, गीतार्थचंद्रिका यांची नोंद केली असून गीतार्थचंद्रिकेत प्रथम गीताश्लोकावर संस्कृत भाष्य व नंतर मराठी टीका क्रम कसा आहे हे स्पष्ट केले आहे. भावे ग्रंथाचे नांव गीतार्थबोधचंद्रिका देतात तर तुळपुळे गीतार्थचंद्रिका नाव सांगतात. वास्तविक गीता गीतार्थबोध, गीतार्थचंद्रिका असा दासोपंतांच्या ग्रंथांचा क्रम आहे. गीतेवरील संस्कृत भाष्याचे नाव गीतार्थबोध असून गीतार्थचंद्रिका मराठी टीकेचे नाव आहे. हे डॉ. कात्रे यांनी दाखवून दिले आहे.[२] गीतार्थबोधभाष्याचे बारा हजार संस्कृत श्लोक अनुष्टुभ् वृत्तांत आहेत. गीतार्थचंद्रिकेच्या ८८८९ ओव्या आहेत. भाव्यांनी या ग्रंथाची जी वीस हजार ओवीसंख्या दिली आहे ती बरोबर नाही. भाव्यांनी संस्कृत भाष्य व मराठी–टीकेची संख्या एकत्र मोजून आपल्या ग्रंथात दिली असावी.

या ग्रंथाच्या नावाबद्दलही अभ्यासकांची मत-मतांतरे आढळतात. महाराष्ट्र कवि मासिकाच्या आधारे आजगांवकरांनी गीतार्थबोध नाव दिले आहे. चांदोरकरसूचीत 'गीतार्थबोधचंद्रिका नाव आढळते.[३] भाव्यांनी हेच नाव दिले आहे. डॉ. तुळपुळे पुरवणीत गीतार्थचंद्रिका नावं नोंदवून सूचीत गीतार्थबोधचंद्रिका नाव देतात. श्री. भगवंतराव देशमुखांनी 'गीतार्थचंद्रिका' नाव निश्चित करून प्रस्तुत ग्रंथाचे संपादन केले आहे. पांगारकरांनी आपल्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासात गीतार्णवबोध नाव दिले असून गीतार्थचंद्रिकेचा उल्लेख त्यांच्या इतिहासात आढळत नाही. शंकरराव देवांच्या यादीत गीतार्णव, गीतार्णवबोध, गीताभाष्य, सार्थगीता, अशा चार गीताटीकांची नावे आढळतात. गीतार्णवबोध व गीतार्थबोधचंद्रिका ही एकाच ग्रंथाची नावे दिसतात. गीतार्णवबोध नावाची स्वतंत्र गीताटीका नसावी. देवांनी अंबाजोगाई येथील दासोपंतांच्या देवघरांतील यादीवरून दासोपंतांच्या ग्रंथांची यादी केली होती. गीतार्णवबोध नावाची गीतार्णवाहून स्वतंत्र टीका नसावी असे दिसते. गीतार्थबोधचंद्रिकेचेच गीतार्णवबोध नाव असावे. या नावाचा दासोपंतांचा ग्रंथ उपलब्ध झाल्यास मराठी वाङ्मयांत निःसंशयपणे मोलाची भर पडेल. अशाप्रकारे गीतार्णवबोध गीतार्थबोधचंद्रिका व गीतार्थचंद्रिका या नावाने प्रसिद्ध असलेली एकच गीताटीका आहे. दासोपंतांनी गीतार्थचंद्रिका नावाऐवजी गीतार्थबोधचंद्रिका नाव दिले आहे. दासोपंत लिहितात

गीतार्थबोधचंद्रिका । आरंभिली हे लघुटीका
संतोषी करू लोका । श्रोतयाते ॥

या लागी पदार्थु नेटका । येसी ते हे लघुटीका
गीतार्थबोधचंद्रिका । नामें रचिली ॥

गीतेवरील गीताभाष्याची नोंद देव, पांगारकर, आजगांवकर व चांदोरकर यांनी केली आहे. भावे व तुळपुळे यांच्या मते गीतार्थबोधचंद्रिकेतच गीताश्लोकावर संस्कृतभाष्य आहे. मराठी ग्रंथकारांनी गीतेवर विपुल टीका लिहिलेल्या आढळतात. परंतु संस्कृतभाष्य लिहून त्यावर मराठीत टीका लिहिणारा दासोपंत एकमेव ग्रंथकार आहे. एकाच ग्रंथावर भाष्य व टीका लिहिणारा दासोपंतांसारखा दुसरा ग्रंथकार आढळणार नाही. त्यांच्या गीताभाष्याची रचना संस्कृतात झाली

१. महाराष्ट्र सारस्वत, पाचवी आवृत्ती.

२. दासोपंतांच्या संस्कृत रचना : कात्रे स. ल., विदर्भ संशोधन वार्षिक १९६७.

३. संत कवि काव्यसूचि–चांदोरकर गो. का.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व हे भाष्य स्वतंत्र नसून गीतार्थबोधचंद्रिकेतीलच आहे सार्थगीता व गीताभाष्य यांची नोंद सूचीत वेगवेगळी जरी करण्यात आली असली तरी मुळात गीतार्थबोधचंद्रिकेचे ते भाग होत हे स्पष्ट आहे. अभ्यासकांनी वा परंपरेतील जिज्ञासू व अभ्यासार्थी यांनी स्वतःच्या उपयोगासाठी मूळ ग्रंथावरून वेगवेगळ्या प्रती केल्या असाव्यात. यावरून हे स्पष्ट होते की, मूळ गीतार्थबोधचंद्रिका ग्रंथाचे लेखन अभ्यासकांनी स्वतः अध्ययनासाठी खंडशः केले असावे. सार्थगीता व गीताभाष्य हे वेगवेगळे स्वतंत्र ग्रंथ नसून गीतार्थबोधचंद्रिकेचेच अंश आहेत. सार्थ गीता व गीताभाष्य या ग्रंथांची स्वतंत्र व गीतार्थबोधचंद्रिकेहून भिन्न प्रत जोपर्यंत उपलब्ध होत नाही तोपर्यंत असे समजण्यास प्रत्यवाय नसावा की गीतार्थबोधचंद्रिका नावाची संस्कृत मराठी रचना दासोपंतांनी लिहिली असावी.

गीतार्णव नावाचा दुसरा ग्रंथ दासोपंतांनी गीतेवर लिहिला. भाव्यांनी गीतार्णवाची ग्रंथसंख्या सव्वालक्ष दिली असून अठराव्या अध्यायाची ओवीसंख्या १६००० देतात. त्यांनी 'ग्रंथसंख्या' शब्द नेमक्या कोणत्या अर्थाने वापरला हे निश्चित सांगता येत नसले तरी त्यांना त्या शब्दावरून ओवीसंख्या अभिप्रेत आहे असे दिसते. डॉ. तुळपुळे यांनी १८ व्या अध्यायाची ओवीसंख्या १८००० दिली आहे. एकाच अध्यायात संख्येच्या बाबतीत भावे व तुळपुळे यांच्या मतात दोन हजार ओव्यांचा फरक आढळतो. गीतार्णवाच्या अध्याय १, २, १२, १८ व १३ (अपूर्ण) मिळून ओवीसंख्या ४१,०५५ होते. शिवाय समर्थवाग्देवता मंदिर, धुळे येथे ९५२ बाडांकात दासोपंतांच्या गीतार्णवाचा नववा अध्याय असून त्याची ओवीसंख्या ४०६५ आहे. यावरून गीतार्णवाच्या १, २, १२, ९, १८, १३ (अपूर्ण) अध्यायाच्या ४५,१२० ओव्या आजपर्यंत उपलब्ध आहेत. मूळ ग्रंथाचा जवळजवळ एक तृतीयांश भाग मुद्रित झाला आहे. वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की गीतार्णव व गीतार्थबोधचंद्रिका असे दोनच ग्रंथ दासोपंतांनी गीतेवर रचले आहेत. महाराष्ट्र सारस्वतकार भावे समजतात त्याप्रमाणे एकट्या गीतेवरच्या पाच-सहा टीका दासोपंतांच्या नाहीत. चांदोरकरांनी गीतास्तोत्र व गीताप्रबंधस्तोत्राची नोंद केली असली तरी ही दोने स्तोत्रे आहेत हे उघडच आहे. आजगांवकरांनी गीतास्तोत्र व गीताप्रबंधस्तोत्र अशी नोंद केली आहे. गीताऐवजी 'गीत' हा मुद्रणदोष असावा, असे दिसते. देव व पांगारकरांनी गीतस्तोत्र व प्रबंधस्तोत्र अशी नोंद केली असली तरी गीतप्रबंधस्तोत्र असेही नाव दिले आहे. हे सर्वच मूळ ग्रंथ पाहिल्याशिवाय यावाबत योग्य मत देणे योग्य होणार नाही. हा प्रश्न स्वतंत्र लेखाचा असल्यामुळे व त्याचा गीतारचनेशी संबंध नसल्याकारणाने त्याबद्दल येथे अधिक जास्त विवरण करण्याची आवश्यकता नाही.

गीतार्णव व गीतार्थबोधचंद्रिका यांच्या रचनेचा अनुक्रम कोणता असावा असा प्रश्न निर्माण होतो गीतार्णव ग्रंथाच्या रचनेबद्दल भाव्यांनी अशी आख्यायिका दिली आहे की, ह्या ग्रंथाची रचना वीस वर्षे चालू होती.[४] ही समजूत ग्रंथाच्या अवाढव्यतेमुळे प्रचलीत झाली असावी. हे दोनही ग्रंथ अंबाजोगाई येथे झाले असल्यास शके १४९७-१५३५ दरम्यान यांची रचना झाली असावी. गीतार्थबोधचंद्रिकेस लघुटीका नावाने दासोपंत संबोधतात. शिवाय या टीकेतील गीतार्थबोध नावाचे संस्कृत भाष्य ग्रंथकाराच्या परिणत प्रज्ञेचे द्योतक आहे. त्यांच्या ग्रंथांची नावे वैशिष्टयपूर्ण असून दश उपनिषद भाष्यांना अर्थप्रकाश असे नांव आढळते. गीताटीकेला अर्थचंद्रिका असे नाव आहे. भाष्य व टीका यांना अर्थप्रकाश व अर्थचंद्रिका संशोधनाचा प्रकार फक्त दासोपंतांच्या ग्रंथांतच दिसून येतो. ही नावे त्यांनी उपनिषद व गीता संदर्भातच योजिलेली आहेत. यावरून उपनिषद व गीतार्णव ग्रंथांची रचना केल्यानंतर गीतार्थबोधचंद्रिका नावाची संस्कृत-मराठी भाष्यटीका त्यांनी लिहिली असावी असे दिसते. गीतार्णवासारखी अवाढव्य रचना केल्यानंतर गीतार्थबोधचंद्रिका त्यांनी लिहिली असावी. आयुष्याच्या अखेरीस शके १५३०-३५ दरम्यान हा ग्रंथ तयार झाला असावा.

---

४. एकनाथ पंचक-महाराष्ट्र सारस्वत-लेखक वि. ल. भावे.

□ □

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाहनें आणि मी

कुंदा पारसनीस

चाकांच्या वाहनांचे मला लहानपणापासून जबरदस्त आकर्षण ! गॅलरीच्या कठड्याला ओठंगून किंवा जाळीला नाक लावून मी आमच्या गिरगावच्या रस्त्यावरून धावणारी वाहने तासन्तास बघायची. 'कांदे बट्टाट्टीऽऽयृ' अशी हाळी देणाऱ्याचा पोऱ्या त्याच्या हातगाडीत जेव्हा बसायचा तेव्हा अस्सा हेवा वाटायचा. माझा दादा (दीड वर्षाने मोठा म्हणूनच) खडी दाबायच्या रुळाच्या इंजिनामध्ये एकदा बसला तर दिवसभर चार अंगुळे वर वावरत होता नि मला खडीप्रमाणे दाबल्यासारखे वाटत होते. पुढे त्याने माझी 'मी मोठा झालो की तसा एक रूळच घेऊन टाकीन. नाहीतर ट्रक घेईन. मग बस हव्वी तेवढी.' अशी समजूत घातली ती गोष्ट अलाहिदा. पण बाबांच्या ऑफिसातल्या नोकरीचा मला भयंकर कमीपणा वाटला, मालकीचा ट्रक नाही, खडी दाबायचा रूळ नाही, साधी हातगाडीही नाही. म्हणजे आहे काय ?

तशी माझी हौस पुरी होत होती. बस, ट्रॅम, लोकल यांना मरण नव्हते. 'चिमा काय कामाची' ह्या वाक्याप्रमाणे ह्या मुंबईच्या लोकलगाड्यांची चाल. एकदा एक टोक इंजिन तर परतताना दुसरे टोक इंजिन. त्यातून नकटे !—नाहीतर आजोळी नेणारे इंजिन कसे रुबाबदार ! भकभक् धूर सोडणारे, शिट्ट्या वाजविणारे ! मी जाहीर करून टाकले की मी मोठेपणी कोळसेवाला होणार (ड्रायव्हरची जागा दादाने बळकाविली होती). काळे झालेले कपडे, डोक्याला चौकडींचा रुमाल बांधलेला, पिळदार हाती फावडे घेऊन कोळसे ओढणारा नि भट्टीत भिरकावणारा, लालपिवळ्या प्रकाशात चित्रासारखा दिसणारा—केव्हातरी आमगाडीतून जायला मिळणार ! पण मला सगळे चिडवून, म्हणाले, "तुला कोण ठेवणार त्या नोकरीवर ? तू मुलगी, तू–" मी म्हटले, "का नाही ? खूप खूप मनापासून इच्छा केली की सर्व प्राप्त होतं–आजोबा सांगते तसं. मग होईनही मी घष्टपुष्ट कोळसेवाला." दादा एकटा माझ्या बाजूला पण बाकी सगळ्यांनी मला वेड्यात काढले. मला वाटते, women's lib–स्त्रीमुक्तीची चळवळ ह्याबद्दल मला सहानुभूति वाटते त्याचे कारण ह्या childhood frustration मध्ये सापडावे !

लहानपणी गॅलरीभर तीनचाकी सायकल चालवून चाळ दाणाणविली. पण दुचाकी चालविण्याची हौस पुरी व्हायला पुण्याच्या कॉलेजात दाखल होईपर्यंत थांबावे लागले (कारण मुंबईतल्या गिरगावात सायकल चालविणे म्हणजे दोन पायडिले मारा, उतरा; चार पायडिले मारा, उतरा; हातात सायकल धरून गर्दीतून वाट काढा, हाच प्रकार). पुण्याला सगळे विद्यार्थी विद्यार्थिनी ऐटीत चारचारच्या ओळी करून सायकल चालवीत म्हणून मीही ईर्षेने शिकले. 'you don't have to worry, श्वासोच्छ्वासासारखी सायकल चालविता येते'—असे जाणकार म्हणतात पण मला श्वास रोधून नेट लावावा लागत असे. काही काही वेळा दगड पुढे आला आहे, चाक पंक्चर झाले आहे, समोर भिंत आली की डावीउजवीकडे वळायचे असते व त्यासाठी हँडल फिरवायचे असते हे वारकावे माझ्या उशीरा लक्षात येत. पण अर्थात् त्या एका कोळियासारखी किंवा त्या कष्टकरी मुंगीसारखीच मीही चिकाटी सोडली नाही. परिणाम असा झाला की मी दिसले रे दिसले की 'होशियार ?' 'निगाह रखो'च्या ललकाऱ्या व्हायच्या, मुलेमुली मार्गातून पटापट दूर व्हायचे. तर ते असो. आम्ही मित्रमैत्रिणींनी एक दिवस पुण्याजवळील पाषाणाची ट्रिप काढली (अर्थात् सायकलींवरून). म्हसोबा गेटपाशीच म्हशींचा कळप. दुर्दैवाप्रमाणे आड आला. (होय. त्याकाळी पुण्याच्या फर्ग्युसन रोडवर म्हशींचा कळप दिसत असे. आता घोडम्या व टोणगेच दिसतात). बॅलन्स करीत दांडी पकडणे, घंटा वाजविणे, ब्रेक दाबणे, 'ए म्हशी बाजू बाजू' ओरडणे ह्या सर्व गोष्टी मी एकसमयावच्छेदेकरून केल्या आणि मग सायकल सोडून उताणी पडले. माझ्या मित्राने मला रस्त्यावरून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उठविले, सायकल उचलली पण पुन्हा बसणार कशी ? माझ्या सायकलिंगची ती एक गोम होती. एखादा उंच दगड किंवा कट्टा असल्याशिवाय मला सीटवर बसताच येत नसे. म्हणजे आले का दगड आढळेपर्यंत दहाबारा फर्लांग चालणे ! झाले ! बुडाखाली सायकल घेऊनच जन्माला आलेला तो प्राणी वैतागला. "तू बस. मी सायकल धरतो. तुला पाडणार नाही. हे चालणं नको बुवा. काय ही कटकट. बस तू." अशी त्याने वचने दिली. (हाय रे दैवा ! एवढा चान्स मिळून शेवटी हीच वचने ना ?) पण मला त्याची खात्री वाटेना. आणि झालेही तसेच ! मी पडणारशी माझी भीती खरी ठरली. मग—'तुझं आडदांड काम'—'तूच हडकुळा' इत्यादी देवाणघेवाण, मग समझोता. शेवटी एकदाचे आम्ही कंपूला जाऊन मिळालो तेव्हा त्यांना भलतेच वाटले ! पण कसचे काय ? आम्ही एकमेकांचा एवढा धसका घेतला होता की जीवनाच्या रोमँटिक का काय म्हणतात त्या वाटचालीचा विचारदेखील मनात येणे शक्य नव्हते. हूं : ! असते एकेकाचे नशीब !

सायकलिंग म्हणजे तोल सावरायचा. मोटारचे तर तसे नसते. ती काय सोप्पी गोष्ट ! ह्यांच्या पाठीमागे लागलागून सेकंडहँड मोटर ह्यांना घ्यायला लावली (कुठल्या सालचं मॉडेलं नि मेक मात्र तेवढं विचारू नका). 'आता मला शिकवा की तुम्हाला ऑफिसात नेत आणत जाईन. मग तुम्ही राजासारखं सुखानं रहा'—हे ओघाने आलेच. सर्वसामान्य रूढीला धरून ह्यांनी विरोध केला आणि सर्वसामान्य रीतीला धरून मान तुकविली. आणि मी मोटरच्या चाकामागे स्थानापन्न झाले. ह्यांनी सगळे दाखवून दिले. ही इंजिनची किल्ली, हे दिव्याचे बटनं, हा क्लच, हा ॲक्सिलरेटर, हा ब्रेक; गिअर बदल, अमुक कर, ढमुक कर. माती, मसण, दगड नि धोंडे ! मग दररोज मोटार चालविण्याची प्रॅक्टीस. ब्रेक लावण्याऐवजी ॲक्सिलरेटर दाब अशा क्षुल्लक चुका वगळता मला मोटार चालविता येऊ लागली. उजव्या बाजूला, डाव्या बाजूला वळताना, थांबताना वगैरे वगैरे प्रसंगी हात बाहेर काढून हलवायचा असतो तेही प्रकार मी करू लागले. एकदा थोडक्यात बचावले. पाठीमागची मोटारं आमच्या गाडीवर जवळ जवळ आदळलीच ! चूक पाठीमागच्या ड्रायव्हरची (शप्पत !) पण तो माणूस—सभ्य दिसला होता—पोलिसला सांगतो कसा, "ह्या बाईंनी उजवीकडे वळणार अशी खूण केली. अन् मग त्यांच्या शिरस्त्याप्रमाणे डावीकडे किंवा सरळ न जाता त्या चक्क उजव्या बाजूलाच की हो वळल्या ! माझी काय चूक ?" जखमेवर मीठ म्हणजे त्या माणसाला पोलिसाने हसत हसत सोडून दिले.

नेहमीप्रमाणे, मी मोटार चालवीत असताना, सूचना द्यायला हे जवळ बसले होते. मी मजेने खूप वेगाने गाडी हाकत होते. जाणकारासारखे म्हटले, "पिस्टनचा खटखट आवाज होतोय् वाटतं. एकदा ओव्हरहॉलला दिली पाहिजे मोटार." हे म्हणाले, "हा पिस्टनचा आवाज नाही. भीतीमुळे माझ्या सर्वांगाला कापरं सुटलं आहे. हा माझ्या हाडांचा आवाज आहे."

सर्व काही सुरळीत चालले. एका चौरस्त्यावर लाल दिवा म्हणून मोटार थांबविली. दिवा हिरवा

(पृष्ठ ३७२ वरून)

वंशाचा संख्या-ह्रास व वृत्तिलोप, वर्णलोप होत गेला. (म्हणूनच 'शस्त्रं द्विजातिभि ग्राह्यं यत्र धर्मोपरुध्यते' म्हणजे धर्मावर संकट आले असता नुसत्या क्षत्रियांनीच नव्हे तर सर्व त्रैवर्णिकांनी लढले पाहिजे असे मनुस्मृतीला सांगावे लागले.) वृत्तिलोप वर्णवर्णलोप होऊन अवशिष्ट क्षत्रिय मंडळी कृषि, गोरक्ष्य, वाणिज्यादि वैश्यकर्म करू लागली. फार काय, महाराष्ट्रात क्षात्रकर्म, राजन्यकर्म सुटत गेले तसतशी कृषिकर्म, गोपालन करू लागलेली मंडळी मूलत: क्षत्रिय असूनही क्षत्रिय मराठ्यांहून भिन्न अशी कुणबी ठरत गेली हा इतिहास तर प्रसिद्ध आहे. कुल म्हणजे दोन षड्गव नांगरांनी म्हणजेच बारा बैलांकडून नांगरली जाईल एवढी जमीन असे मनुस्मृतीवरील कुल्लूकभट्टाच्या टीकेत स्पष्ट आहे. ती ज्याच्यापाशी आहे तो कुलपती व त्याचेच अपभ्रष्ट रूप कुळंबी, कुणबी असे झाले. तात्पर्य, होळकर हे पुढे खुटेकर धनगर झाले तरी मूलत: ते 'औलिक' वंशीय क्षत्रिय होत. त्यांचे धनगरपण हे त्यांच्या औलिकरवंशमूलकत्वास बाधक ठरत नाही हे वरील विवेचनावरून स्पष्ट होण्यास हरकत नसावी. □ □

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झाल्यावर जायचे. पण मला इंजिन सुरूच करता येईना. (मेले बटणे नि दांड्यांचे प्रकार तरी किती !) खूप खटपट केली पण मजा बघणाऱ्या ह्यांच्याप्रमाणे इंजिनही थंड ! हिरवा, पिवळा, लाल, पिवळा, हिरवा–ट्रॅफिक लाइट्स् बदलत होते. मागे रांग लागलेल्या गाड्या वाट काढून, जाताना डोळे वटारून, पुढे गेल्या. जरा वेळाने ट्रॅफिक पोलिस आला नि म्हणाला, "बाईसाहेब, तुम्हाला आमच्या ट्रॅफिकच्या दिव्यांचे कोणतेच रंग मनपसंत नाहीत का ? गाडी पुढे जात नाही म्हणून आपलं सौजन्यानं विचारतोय्." चरफडले. हेडलाइटस् उघडले, बंद केले. हॉर्न वाजवला. मग अचानक नेमक्या ठिकाणी हात लागून गाडी हिसक्याने सुरू झाली. त्या पोलिसला चाटून पुढे सटकली. झेब्रा क्रॉसिंगच्या (काळ्या पांढऱ्या, पादचाऱ्यांचा पट्ट्यांच्या) बरोब्बर मधून उजवीकडे वळली, एका जाणाऱ्या मोटारीला धक्का देऊन फुटपाथजवळच्या आगीच्या लाल पंपासमोर (हायड्रंट) नेमकी घुंई घुंई करीत थांबली. पाठीचे मडगार्ड गायब ! तो पोलीस धावतच आला. "हे पाहा बाईसाहेब, हा तर सर्कशीमधला आश्चर्यकारक प्रयोग करून दाखविलात की ! आता पुन्हा एकवार करून दाखवा. नि ह्या खेपेला, मी जमिनीवर एक हातरुमाल अंथरतो, तोही दातांनी उचलून दाखवा."

हे केविलवाणे हसून म्हणाले, "मोटर ड्रायव्हिंग शिकतेय् माझी बायको." एक सुस्कारा सोडीत पोलिस उद्गारला, "किती दिवस चालणार हे. इतर लोकांनाही आवडतो हा रस्ता वापरायला. इतरांची वाहनंही ह्या रस्त्यावरून जात–येतात. त्यांना सुरक्षित. . ."–"काय चुकलं हो माझं ?" "मला धक्का लागला, तें जाऊ दे. पण त्या मोटरलाही तुम्ही धक्का दिलात. मी त्यावेळी शिट्टी वाजवली ती ऐकू नाही आली ?" मी मान हलविली. त्यानेही गंभीरपणे मान हलवीत म्हटले, "छे, छे ! बाईसाहेबांचं हे शिक्षण चालू आहे तोपर्यंत रजा घेऊन मी घरीच बसतो." शेवटी मी कौशल्याने रिव्हर्समध्ये गाडी टाकून आगीच्या पंपापासून मोटार मागे घेतली. रस्त्यावरून सरळपणे जाता जाता त्या पोलिसाने शेवटचा फटकारा मारलाच. ओरडून तो म्हणतो कसा, 'साहेब, तुम्हाला एक सूचना देतो, तुमची मोटार एका बाजूने तांबडी आणि एका बाजूने हिरवी रंगवून घ्या. म्हणजे काही घडलंच तर साक्षीदारांच्या सांगण्यातच घोटाळा उत्पन्न होईल–सुटण्याची तेवढीच आशा !"

माझ्याविरुद्ध असा कट करण्यात आल्यामुळे माझे मोटर चालविणे मला सोडावे लागले आहे, ह्या अन्यायाविरुद्ध माझे मन आक्रोश करून उठले आहे. मी आशा सोडलेली नाही. एक दिवस त्या पोलिसासमोर दिमाखाने सफाईदारपणे गाडी चालवीनच–चालवीन.

□ □

लेखकांना विनंती

- 'युगवाणी'साठी साहित्य पाठविताना– ते कागदाच्या एका बाजूवर, सुवाच्य अक्षरात व मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखननियमांनुसार लिहिलेले असावे.
- निर्णयासाठी पुरेसे टपालहशील सोबत पाठविणे आवश्यक आहे.
- नापसंत साहित्य परत पाहिजे असल्यास पुरेसे टपालहशील लावलेले पाकीट साहित्यासोबत पाठवावे. त्यावर स्वतःचा पूर्ण पत्ता लिहिलेला असावा.
- साहित्य -- स्वीकृतीसंबंधीचा निर्णय साधारणतः दीड–दोन महिन्यात कळविला जाईल.

– संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवनगाणे

संजीवनी देशमुख

काहीतरी लिहायचं म्हणून मी बसले आहे. बरेच दिवसात काही लिहलं नाही. 'मूड'च लागत नव्हता.

आज लिहायचंय्.

काही तरी..जे आठवेल ते...प्रतिभेला विझू द्यायचे नाहीये.

अनेक विषय मनात घोळताहेत..
अनंत विचारांनी मन व्याप्त झालं आहे.
एक अनामिक वेदना हृदय जाळते आहे.

लेखनातून समाजाला संदेश द्यायचा आहे. जागृती करायची आहे.

अरे–खाली जाऊ नका.
उन्नतीच्या वाटेवर म्हणून प्रकाशाकडे चला.
कुणी सांगावं ? कुणाला ? आणि कशाकरता ?

मला प्रेम वाटायचं आहे. कुणाला देऊ ? माझं प्रेम स्वीकारण्यास कुणी तयार आहे काय ? कुणाला त्याची गरज आहे काय ? ज्याला गरज आहे त्याला मी शोधून कशी काढू ?

कुठे शोधू ?
निरपेक्ष, शुद्ध प्रेम मला करायचं नाही.
माझी आस आहे सापेक्ष प्रेमाची–
प्रेम द्यायचं आणि घ्यायचंही !
कुणाला मागू ? कुणाला साद घालू ?

अरे–कुणाला या जगात खरोखरच प्रेमाची गरज आहे का ?

एका गरीब मुलीवर प्रेम करून पाहिलं. विपरीत अनुभव आला. तिने दगा दिला. खोटचा गोष्टी केल्या.

आता ताक सुद्धा फुंकून प्यावं लागतं.

एखादा आंधळा रस्त्यावरून जात असतो. त्याला रस्ता क्रॉस करायचा आहे. तो एके ठिकाणी वाहनांच्या आवाजाचा अंदाज घेत थांबला आहे. कुणाच्या मदती-करता तो याचना करीत नाही. आले असतील काही अनुभव...

एकदा वाटतं–स्वतःहून त्याला मदत करावी.. पुन्हा वाटतं–तो अंगावर खेकसेल–

'No–Thank you–माझा मी जाऊ शकतो. रोजची सवय आहे मला.'

त्या तुटकपणापेक्षा अलिप्त राहिलेलं बरं.. आंधळ्याजवळून मी झपाझप चालू लागते–मन म्हणतं–

'अरे–कुणीतरी त्याला रस्ता क्रॉस करायला मदत करा रे–'

हे आणि असेच कितीतरी प्रसंग ! मला शोध घ्यायचाय् एका मनाचा ! ज्या मनाचा माझ्या मनाशी सुसंवाद साधेल अशा मनाचा. जे मन माझ्या मनाशी समतोल आहे अशा मनाचा.

मला माहित आहे–सगळी माणसं अशीच आहेत. माझ्यासारखी. विझत आलेली माणुसकी सार्‍यांजवळ आहे. ती लपवण्याचा सर्वजण प्रयत्न करीत आहेत.

मर्ढेकर या–
तुमचे पद्य सर्वांच्या कानापर्यंत जाऊन पोहोचू शकलं नाही. गद्याचा अवतार धारण करायला एकदा या–
तुमची फार फार...उठता बसता गरज वाटत्येय हो...

'नीट डोळे उघडे ठेवून पहा–सत्य हे कल्पनेपेक्षा भयानक असतं. अनेक विषय मिळू शकतात तुम्हाला कथा लिहायला–' एक प्रामाणिक सजेशन्–

'तुम्ही ऐतिहासिक कथा कादंबऱ्या का लिहित नाही ? लवकर नाव होतं–' एक प्रांजळ कथन.

'समाजाच्या सर्व थरात उतरा–लेखनाला कोण-तीही मर्यादा ठेवू नका–'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'मागणी तसा पुरवठा नको. सत्त्व टिकवून धरा–'

'एखादी भयकथा का लिहून पहात नाही?'

अनेक प्रश्न मनावर येऊन आदळत आहेत. दोन्ही हात डोक्यावर घेऊन मी सुन्न बसले आहे.

वात्सल्य म्हणजे काव्य, असं एका कवीने म्हटलंय्. प्रत्यक्षात त्राग्याचा अनुभव अधिक,

काव्य असलंच तर ते फार अपुरं... काही क्षणापुरतं मर्यादित–

कविवचनाचा आकंठ लाभ कुठे घ्यावा?

कल्पना आणि अपेक्षा याच्याशी काहीं नातंच हल्ली उरलेलं नाही. तुझी स्टाइल कायम ठेव–प्रायोगिक लेखन करा. प्रतिभा हरवत चाललीय्...नाही.

मला हे सहन होणार नाही. समाज टीका होवो–कुणी मला वाईट म्हणो–काही होवो–मला लिहायचंय, माझा पिंड–नकोच. आवेश कशाला हवाय्? आपल्याला काही केशवसुतांचं अनुकरण करायचं नाही. खरं तर कुणाचंच अनुकरण करायचं नाही. पण काहीतरी सांगायचंय्–

— काहीतरी शोधायचंय्. सर्वांना उठवायचंय्. अरे, झोपू नका. जागे व्हा, निराश होऊ नका.

अन्यायाविरुद्ध ओरड करा. परिणामाची अपेक्षा करू नका. लढायला सिद्ध व्हा–श्रमू नका–रोम वॉज नॉट बिल्ट इन ए डे.

झालं सांगून? नाही. आणखी खूप सांगायचं आहे. सांगता सांगता थकायचं आहे.

मग खाली उतर. खेड्यात जा. बहुजनसमाजात मिसळ. प्रवास कर. अनुभूती घे. साक्षात्कार घडव. अल्पसा.

अंगावर काटा उभा राहतोय्. म्हणे अनुभूती घे! एकटा मी–कुणाकुणाची अनुभूती घेऊ? परिस्थितीची? मानसशास्त्राची? कुठे कुठे पुरे पडू? प्रतिभा म्हणजे काही यंत्र नाही. डोकं दुखतय. शरीर पिळूनी निघेल घाम–पुढचं भाग्य कुठलं?

'अगदी राहवेनाचं म्हणून आलोय् मी' कोण म्हणालं? मनातूनच कुणीतरी बोलतय्! कोण आहे कोण जाणे!

सोडून द्या हे सर्व. इतरांसारखे जगा. म्हणा–संसार एके–संसार–संसार दुने–मुले. संसार त्रिक–महागाई. संसार चोक–यंत्रवत् जगणे. संसार पाचे–दुःख. संसार सखं–वैताग. संसार साते–चिडचिड. संसार ...आठे केव्हातरी मरण!

अर्थ काय ज्योतीचा? मुलीचं नाव ज्योती! कशाला ठेवायचं ते? वेळ अशी आली आहे की अंधार ज्योतीला गिळतोय्–अंधार! नाव ठेवा–तिमिर!

'तुला झटपट लेखिका व्हायचंय् का?' 'अं?'

'कुणाला काही समजणार नाही असं लिही म्हणजे होशील बडी लेखिका'–'पण मी काय लिहिलं ते इतरांना करणार नाही' 'अर्थातच' 'मग लिहायचंय् कशाला?' 'तुझ्या समाधानाकरता.' 'मग डायऱ्या भरून ठेवाव्यात. प्रसिद्धीला पाठवू नये–'

'कधी कधी माझ्या डोळ्यातून घळघळा पाणी येतं. का ते कळत नाही.' 'कधी कधी मला विनाकारण एकांतात बसून रहावसं वाटतं. कुणाशी बोलू नये–हसू नये–काही करू नये.' 'मला जगाला उगीचच लाथ मारावीशी वाटते–' 'हा आठवडा फारच बोअर गेलाय्. कशातच लक्ष लागत नाही–बरेच दिवसात घरून पत्र आलं नाही म्हणून असेल' 'बरेच दिवसात काही लिहू शकलो नाही म्हणूनही असेल.' 'बरेच दिवसात मनसोक्त गाण्याची प्रॅक्टिस झाली नाही म्हणून–' पहा ही एकसूत्रता माणसां–माणसाला जोडणारा दुवा–खरं तर माणसा–माणसाला जोडणारा दुवा म्हणजे माणुसकी!

केवढा भयानक शब्द! आम्हाला याची ओळख नाही. हा शब्द शब्दकोशात नाही, कुठेही नाही. काढून टाका तो. ह्या शब्दाला जगात स्थान नाही–मान तर नाहीच नाही. आम्ही एक होतो ते वैतागामुळे. आमचं एकमत होतं ते त्राग्यामुळे. सामर्थ्य असलेली एकता! उगाचच मनात येतं–खांडेकर अंध झाले आहेत.

कॉलेजचा वर्ग. क्रांतिवीरांची गाथा सुरू आहे.

सावरकर, चाफेकर बंधू–फडके, धिंग्रा. दहशतवाद... फाशी... हौतात्म्य... स्वातंत्र्यविषय रंगलाय्. मुलींचं लक्ष नाही. त्या एकमेकींना हळू आवाजात जोक्स सांगून हसत आहेत. हसताहेत आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हसवताहेत. ऐशी मुलींचा वर्ग. बाई कुणाकुणाला रागावणार ?

विरस, हताशपणा–दु:ख. संताप याचा परिणाम– निर्विकारता–त्या स्तब्ध झाल्या आहेत. मुलींचा गोंधळ वाढतो आहे. कॉलेज म्हणजे मंदीर. या मंदिरात सरस्वतीची प्रतिष्ठापना करण्याकरता कुणीतरी या–त्या मुलींना कुणीतरी रडवा. अश्रूंचं मोल कळू द्या–क्रांतिवीरांनो तुमचं हौतात्म्य वाया गेलं आहे.

हसा. सर्वजण हसा. आम्ही रडतो म्हणून तुम्ही हसा. आम्ही मूर्ख आहोत म्हणून हसा. आम्ही बावळट आहोत म्हणून हसा. आमचं नातं तुमच्याशी नाहीये. ते वामनरावांच्या सत्याशी आहे. त्याचा आम्हाला गर्व वाटतो. आम्ही कोण ? ते केशवसुतांना विचारा–

केशवसुतांनी आपल्या नव्या शिपायासह आणि तुतारीसह या जगात पुनर्प्रवेश करावा. पाहिजेत–अनेक केशवसूत. अनेक आगरकर. अनेक वामनराव. अनेक मर्ढेकर. अनेक एकनाथ . . . आणि . . . काळीज असलेली रसिकता.

लेखनाला बंधन नको. कशाचेच. त्याने कोणता संदेश देऊ नये. उपदेशापासून दूर असावे. ते स्वतंत्र असावे. त्याने अनुभवाशी प्रामाणिक रहावे. पण व्यक्तित्वाच्या चौकटी तोडून व्यापक अनुभूती त्याने साकार करावी–आणखी काय करावं ? काही करू नये ! हीच खरी कसोटी–

पैसा मिळवू नये. जागृती करू नये. काळापासून दूर रहावे.

तांब्यांनी यावे–प्रसन्नतेचे साम्राज्य उधळून जावे, विनायकांनी यावे–टिकली मारूनी जावे. आणखी कुणी येऊ नये.

येऊ नये. शालिवाहनाने येऊ नये.
आम्हाला नवा शक निर्माण करायचा नाही.

अहंकार टाकून कर्म करावे. फलापेक्षा न ठेवता कर्म करावे. म्हणजे काय होईल ? मोक्ष मिळेल. करायचं काय मोक्ष मिळवून ?

ही पृथ्वी पाकळ्यांचं कमळ आहे. हे जीवन विषवल्ली आहे. येथें पाऊस पडतो पाण्याशिवाय. वर्षाव होतो वृष्टीशिवाय. ऊन पडतं सावलीशिवाय. बाग उमलते फुलाशिवाय. आनंद होतो मनाशिवाय. दु:ख होते अश्रूंशिवाय. चिंता असतात मर्यादेशिवाय.

आधार नाही. तत्त्व नाही. पाया नाही. पार्श्वभूमी नाही. दु:खाला, आनंदाला, वैतागाला, कशालाच. कुठेही.

कुणीतरी ध्येयाला मोल द्या. कुणीतरी नदीला किनारा द्या. कुणीतरी सृष्टीला हिरवा शालू नेसवा. कुणीतरी त्यावर फुलीची नक्षी काढा. कुणीतरी समुद्र-लाटांना चंद्र दाखवा. भरती येऊ द्या. चैतन्य येऊ द्या–आयुष्याची भूमी. मांगल्याचा सडा. तेजाचे ठिपके. त्यावर कुणीतरी प्रकाशाची रांगोळी काढा. ज्ञानदीप उजळा. जीवनाला गाणे लाभू द्या. गाण्याला सूर सापडू द्या. सुगंध येऊ द्या–सुवासाला सुरुची प्राप्त होऊ द्या–ती बैठक सफलतेची. वी सभा सार्थकतेची. ऐका.

श्रोतेहो या–मोफत जीवनगाणे ऐका.

□ □

वर्गणीदारांसाठी

ज्यांची वर्गणी संपली आहे अशा वर्गणीदारांनाही
'युगवाणी'चा अंक आम्ही पाठविलेला आहे.
कृपया पुढील वर्षाची वर्गणी त्यांनी त्वरित पाठवून 'युगवाणी'वरचा लोभ कायम ठेवावा ही विनंती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी लेखिकांचे अलिकडचे नाट्यलेखन

सौ. शंकुतला खोत

भारताला स्वातंत्र्य मिळून दोन तपांहून अधिक वर्षे झाली. गेल्या पंचवीस–तीस वर्षांत भारतातील स्त्रीच्या जीवनातही कौतुक वाटण्याजोगा बदल झाला. साहित्य, कला, क्रीडा या सर्वच क्षेत्रांत पुरुषाच्या बरोबरीने स्त्री वावरताना दिसते. बौद्धिक क्षेत्रात पुरुषापेक्षा स्त्रीच काकणभर वरचढ झाली; विद्यापीठातील परीक्षांचे निकाल पाहता ही गोष्ट सहज ध्यानात येते.

स्वातंत्र्योत्तर काळात साहित्याच्या प्रांतात काळानुरूप बदल झालेला आढळतो. वाङ्मयाच्या विविध प्रकारांत हा बदल जाणवतो. कथा, कादंबरी, कविता, नाटक या सर्वच वाङ्मयप्रकारांत हा बदल झपाट्याने होतो आहे. नवकथा, नवकविता, नवनाट्य वगैरे प्रकार गेल्या पंचवीस वर्षांत वाढीला लागले. साहित्य क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने लेखन करणाऱ्या स्त्रिया आढळतात ही अभिमानाची आणि कौतुकाची गोष्ट आहे.

परंतु बारकाईने पाहिल्यास एक गोष्ट जाणवते. ती म्हणजे आत्मचरित्र, कथा-कविता, कादंबरी व काही प्रमाणात समीक्षा हे वाङ्मयप्रकार समर्थपणे हाताळणाऱ्या लेखिकांनी नाटक या लेखनप्रकाराची तितकीशी दखल घेतली नाही. नाट्यलेखन करणाऱ्या स्त्रिया फारच कमी; आणि त्यातही सातत्याने नाटके लिहिणाऱ्या तर नाहीतच. असे का ?

गेल्या काही वर्षांतील वाङ्मयप्रकारांचा एकंदर आढावा घेतल्यास असे आढळून येते की आत्मचरित्र आणि काव्य या वाङ्मयप्रकारांची निर्मिती स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर केली आहे. उदाहरणादाखल गेल्या काही वर्षांतील प्रकाशित झालेली ही काही आत्मचरित्रे. जेव्हा माणूस जागा होतो (गोदावरी परुळेकर), स्नेहांकिता (स्नेहप्रभा प्रधान), अजुन चालतेचि वाट (आनंदीबाई विजापुरे), सांजवात (आनंदीबाई शिर्के), सांगत्ये ऐका (हंसा वाडकर) अशी काही नावे प्रामुख्याने नजरेसमोर येतात.

काव्याच्या प्रांतात बहिणाबाई चौधरी आणि इंदिरा संत ही नावे प्रामुख्याने घ्यायला हवीत. बहिणाबाईंची काव्यनिर्मिती तशी म्हटलं तर स्वातंत्र्यपूर्व काळातच झालेली आहे. पण तिचा बोलबाला गेल्या काही वर्षांत झाला.

आत्मचरित्र आणि काव्य हे दोन्ही प्रकार स्त्रीमनाला सहज पेलणारे आणि स्त्रीसुलभ वृत्तीला अधिक जवळचे; किंबहुना या दोन्ही प्रकारांत स्त्रीच्या वृत्तीची समरसता अधिक जाणवते. कथा वाङ्मयप्रकारात प्रामुख्याने मालतीबाई बेडेकर, वसुंधरा पटवर्धन, कमल देसाई ही नावे घेता येतात.

समीक्षा व वैचारिक लेखन या क्षेत्रात कुसुमावती देशपांडे, दुर्गाबाई भागवत व इरावती कर्वे ही नावे घेता येतील.

या सर्व वाङ्मयप्रकाराचा उल्लेख करण्याचे कारण नाटक या प्रकाराकडे पाहता लेखिकांच्या नावांची ही संख्या अगदीच रोडावलेली आढळते. असे का ?

नाट्यलेखन करणाऱ्या लेखिकांत प्रामुख्याने उल्लेख करायचा तर मालतीबाई बेडेकर, शिरीष पै, सरिता पदकी, वसुंधरा पटवर्धन, तारा वनारसे ही काही नावे आढळतात.

वसुंधराबाईंच्या कथांतून प्रभावी संवाद आढळतात. त्यांनी नाटक हा लेखनप्रकार आणखी हाताळायला हवा असे वाटते. प्रभावी संवादांनी त्यांची नाट्यनिर्मिती सहज चांगली वठेल. नाटकात असणारे संवादाचे माध्यम त्यांना प्रभावीपणे वापरता येईल. पण 'हिरकणी' नंतर त्यांनी नाटक लिहिले नाही.

स्त्रीमनाची स्पंदने अचूक टिपणाऱ्या सरिता पदकींनी बाधा (१९५६) हे सुंदर नाटक लिहिले आहे. यातील ताराच्या मनोसंघर्षाने हे नाटक परिणामकारक वाटते. सरिताबाईंनी स्त्रीजीवनाच्या समस्यांशी संबंधित अशी आणखी नाट्यनिर्मिती करावी अशा अपेक्षा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांच्या 'बाधा' नाटकामुळे निर्माण झाल्या. पण त्यांनी 'बाधा' नंतर नाटक लिहिलेले आढळत नाही.

'कक्षा' या सुंदर नाटकानंतर तारा वनारसे यांनीही आणखी नाट्यनिर्मिती करायला हवी असे वाटते. पण त्यांनीही कक्षा नंतर नाटक लिहिले नाही.

सातत्याने जरी नाही तरी दोन तीन नाटके लिहून ज्यांनी मराठी नाट्यवाङ्मयात भर टाकली त्यात मालतीबाई बेडेकर, आणि शिरीष पै यांचा उल्लेख होतो. स्त्रीमनाच्या भावना मनोमन ओळखून त्या समर्थपणे रंगविणाऱ्या, आणि 'बळी' सारखी प्रभावी कादंबरी लिहिणाऱ्या मालतीबाई बेडेकरांनी 'पारध' (१९४७) आणि 'हिरा जो भंगला नाही' (१९७१) या दोनच नाट्यकृती निर्माण केल्या. काळानुरूप स्त्रीजीवनाच्या बदललेल्या समस्यांचे चित्रण करणाऱ्या नाट्यकृती त्यांनी निर्माण करायला हव्यात. 'हिंदोळ्यावर' आणि 'कळ्यांचे निश्वास' व 'बळी' या सारख्या समर्थ निर्मितीमुळे मालतीबाई स्त्रीजीवनावर आधारित असे जबरदस्त नाटक लिहितील असे वाटते. पण त्यांनी या दोन नाटकांनंतर अजून नाटक लिहिले नाही. या दोन नाटकांपैकी 'हिरा जो भंगला नाही' ही त्यांची निर्मिती अनुवादित आहे. फ्रेंच लेखिका मादाम मार्सेल मॉरेटच्या 'ॲनास्टाशिया' नाटकाच्या आधारे मालतीबाईंनी हे नाटक लिहिल्याचे त्या नमूद करतात.

मालतीबाई बेडेकरांप्रमाणेच मुक्ताबाई दीक्षित यांनीही १९५६ पर्यंत दोनच नाटके लिहिली 'जुगार' (१९५१) आणि 'अवलिया' (१९५६). 'जुगार' नाटकाने त्यांनी नाट्यनिर्मितीबद्दलच्या रसिकांच्या अपेक्षा उंचावून ठेवल्या होत्या. अलिकडे काही वर्षांपूर्वी त्यांनी 'अंधार' हे नाटक लिहिले. हे त्यांचे तिसरे नाटक. मुक्ताबाईंनी सातत्याने नाट्यनिर्मिती केल्यास स्त्रीजीवनविषयक समस्यांची प्रभावी हाताळणी होऊ शकेल.

पित्याच्या साहित्यगुणांचा जबरदस्त वारसा मिळालेल्या शिरीष पै यांनी नाट्यवाङ्मयात भर टाकणाऱ्या दोन नाट्यकृती 'सोन्याची खाण' (१९६७) आणि 'हा खेळ सावल्यांचा' (१९६८) निर्माण केल्या. अगदी नुकतेच त्यांनी 'कळी जी उमललीच नाही' हे आणखी एक नाटक लिहिले असे कळते. वास्तविक त्यांना रंगभूमीविषयक अनुभव लहानपणापासून मिळाला असणार. त्यांचे इतर लेखनही मनाला चटका लावणारे आहे. 'सोन्याची खाण' हे त्यांचे नाटक अनुवादित आहे. रूथ व ऑगस्टलस गोएत्स यांचे 'एअरेस' हे मूळ नाटक. हेन्री जेम्सच्या 'वॉशिंग्टन स्क्वेअर' या कादंबरीवर ते आधारलेले आहे. या नाटकाचा अनुवाद शिरीष पै यांनी चांगला केला आहे. शिरीष पै यांचे दुसरे नाटक 'हा खेळ सावल्यांचा' हे प्रा. ए. वि. जोशी यांच्या 'काळोखाचे अंग' या कादंबरीवरून त्यांना सुचलेले आहे असे त्या लिहितात. शिरीष पै यांनी कादंबरीवरून ही सुरेख नाट्यकृती निर्माण केली आहे. लक्षात राहणाऱ्या व्यक्तिरेखा हे त्यांच्या लिखाणातले वैशिष्ट्य जाणवते. त्यांनी स्वतंत्र एखादे नाटक लिहून त्यात जबरदस्त अशी स्त्रीजीवनविषयक समस्या हाताळावी आणि मनावर कोरली जाईल अशी एखादी स्त्रीव्यक्तिरेखा रंगवावी असे वाटते.

गेल्या काही वर्षातील मराठी लेखिकांच्या नाट्यलेखनाचा हा आढावा घेतल्यानंतर जाणवते : नाटक हा लेखन प्रकार स्त्री समरसून का हाताळत नाही ? याचे कारण कदाचित रंगभूमीविषयक अनुभवाची कमतरता हेच असावे.

पण रंगभूमीविषयक अनुभव नसणाऱ्यांनीही नाटके लिहिली असून ती नाटके नटांना आणि दिग्दर्शकांना आव्हान ठरली आहेत. तेव्हा रंगभूमीविषयक अनुभवाची कमतरता हे कारण पुरतेपणी पटणारे नाही.

कदाचित स्त्रीची स्त्रीसुलभ, आत्मनिष्ठवृत्ती जी केवळ भावकाव्य, आत्मचरित्र यासारख्याच वाङ्मयप्रकारांत विशेष रमते, नाटक या वस्तुनिष्ठ, व्यामिश्र प्रकाराला ती तितकीशी अनुकूल नसावी. म्हणूनच समरसून नाट्यनिर्मिती करण्याकडे स्त्रीचा ओढा नाही. एकूण, स्त्री नाटककारांचे अल्प प्रमाण का या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही हेच खरे !

□ □

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ क वि ता ॥

वेदनांच्या आज माझ्या : यादव मुकुंद पाठक

वेदनांच्या आज माझ्या थांबल्या साऱ्या कळा ! । धृ० ।
ती उषःसूक्तावली कानांमधे गुंजारते,
माध्यान्ह-तृप्तीच्या समाधी संवेदना सुस्तावते,
कलत्या दिनी, उलत्या मनी, संध्येत भेटे ती उषा–
अंधारुनी येती दिशा थंडी जरी धरते गळा ! १.
पाणीच पाणी पेलते ही अंगावरी आई क्षमा;
युगयुगांच्या वासनांही माझ्यात झालेल्या जमा;
घोर अंधारीहि माझी साउली मी पाहिली–
सूर्य असताना समोरी विसरलो तिज बावळा. २.
निर्व्यक्तिता जेव्हा लयीचा सहज तालच गांठते
चोहीकडे सुरभारती माझी गमे झंकारते !
माझीच संध्याकाळची कविता मनाशी बोलते !
–संपूर्ण मी विरलो जरी चोहीकडे भरलो असा–
सोकावणाऱ्या या सुखाचा हिरवाच सारा हा मळा ! ३.
जन्मांतरीची प्यास आता भागली, मन तृप्तले–
वेदना माझ्या उरी ! पडसाद भवती पेटले !–
होमकुंडी त्या स्वतांची आहुती वेगे पडे–
आज सम्यक् दर्शनाचा लाभला मज सोहळा ! ४.

पिलूं : म. म. देशपांडे

तुझी कविता :
बकरीचें पिलूं
बँकेंत शिरून
लागलें कोकलूं.

काउंटर जवळ
हिरवळ थोडी ?
तियें पाणी पितात
दुसरींच घोडीं.

तुझा व्यवस्थेच्या
अस्वस्थ आंत,
पोंचत असेल
तरच घाल हात.

नाहींतर कविता
कुरवाळण्याची चीज.
प्रिय वाटणारी
डोळ्यांवरची नीज.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सपन : सुधाकर गायधनी

बाई डोऱ्यात सपन सललं
माय बिलगून त्याहीनं पुसलं
तसं हासू मले फुटलं गे राय बाईजी

हिर्व्या हरदीनं आंग माहा ओलं
जसं देठामंधी दाटून आलं फुल
पाय धरेना बाई तोल गे राय बाईजी

म्हणे सांग ओ सपन का पडलं
तु गे जवान कोन तुले डसलं
तसं छातीत ठेसलं माय राय बाईजी

जशी तूर ओ मुंगात एकली
होती रस्त्यानं सुनसान चालली
तुमची रादा किस्नानं घेरली ओ राय बाईजी

* *

उंटासारखे खूप करून घेतले :

रंगनाथ कुळकर्णी

उंटासारखे खूप भरून घेतले पोटात
आता सहारा तुडवताना अडणार नाही
संथपणे करीन म्हणतो रवंथ

दिसलाच कुठे उंच झाडावर खजूर
तर तिथवर मान लांबवण्याचे बळ
ओवडधोवड मदारीत नक्कीच आहे
एक मदार मूळची
एक कमावलेली.

* *

डोळयांच्या वाटेने घडतो प्रवास :

रंगनाथ कुळकर्णी

डोळयांच्या वाटेने घडतो प्रवास
मनाच्या पिसाट पाखराला
काही डोळे काळे निळे
काही बदामी अस्सल शराबी
काही खुणावणारे, वेडावणारे
लोभसवाणे, जीव घेणे

या डोळ्यांचेच बनतात रुळ
पळतात आशानिराशेचे खेळ
डबे आणि वाघिणी होऊन
लहान मोठ्या स्टेशनांचा मागोवा घेत...
कुणी पडून रहातात
आडगावच्या भयाण ‘ सार्यडिंग ’ला

याच डोळयांचे बनतात सूळ
उद्धरते कूळ, अर्वाच्य शब्दांच्या
ढाली रक्तवंबाळ...

प्रत्येक पाखराचा असतो एक पिंजरा
सर्वात छोटा विश्वाचा
सर्वात मोठा विवेकाचा—
त्याचे गज अदृश्य असतात
पण भारी भक्कम ठरतात...

माना मोडून पडलेल्या
जिवांचे डोळे भिरभिरतात
त्यांचाही एक प्रवास असतो
गोल गोल एकाच बिंदूभोवती—
पहाणाराला एवढी भोवळ
तर फिरणाऱ्याचे काय !

* *

वैभव ...! : कु. ‘ नीर ’ चांदूरकर

जसे कुणा पुरातत्ववेत्त्याला
दिसून पडते
प्राचीन खंडारात
लपलेले वैभव...
मला तुझ्या प्रेमाच्या
मोठमोठ्या शब्दांच्या इमारती मधे
दिसतात आगत भग्नावशेष !

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काळा कातळ : शिरीष गोपाळ देशपांडे

काळ्या कातळामागून सळसळता येणारा पाचोळा
जेव्हा उष्ण वाऱ्याच्या सरपटण्यावर
पुढल्या करपलेल्या माळावर नाहीसा होतो
तेव्हा झाडांच्या सांगाड्यांतून घुटमळणारी शीळ
बाजूच्या टेकाडाला घुसमटत
मौक्यावरच्या पालींवर अडखळते.

चौकीदाराने चिलीम सरकवत मला विचारले होते
आणि आणून दिली होती कोण्या वसतीतली का रानातली
एक मुसमुसती चमेली.
तिच्या शृंगारचेष्टांनी सारा माळ हादरला होता
आज तिला भटकताना पाहिले मी मोकळे सोडून
केस माळावर वेड्यागत : तिने ओळखले नाही.

चटके बसावेत आणि सोलून निघावेत तळपाय; वासनांचे
वांझ माळाला झळांचे मळे डुलताहेत
तसेच सारे भणण पडताहेत तळपत्या आभाळाचे कहर
चिरंतन दुःखाची कुंडली मांडून बसलेला
खोलातून उभारलेला हा काळा कातळ.

* *

शून्यत्वाची थंडगार वेदना :
राम गोसावी

सकाळचे वेळी, लोकलमधून जाताना,
दिसतात मला कळकट माणसे,
बिनधास्त विखरून बसलेली,
सर्वत्र दुर्गंधी पसरलेली
आणि...
केव्हातरी फलाटावर दृष्टीस पडते.
आक्रोश करणारे एखादे मुकेजले तान्हुले,
त्याच्या आईने त्याला वाऱ्यावर सोडलेले,
किंवा...दिसते एखादे वेळेस,
फाटक्या वस्त्रातील एक फाटकी पोर,
जिला पणतीतले पळीभर तेल,
दोन दिवसांच्या कालवणासाठी कसे पुरवावे,
याचा पडलेला घोर,
ही दृष्ये पाहिली की—
काळजात कुठेतरी कळ उठते
माझी मलाच शरम वाटते.
माझे उंची टेरिलिन कपडे,
सोनेरी फ्रेमचा चष्मा
चकचकीत पारकर पेन,
आणि इंपोर्टेड सिगरेट लायटर,
सारे कसे काळवंडून जाते,
आणि शून्यत्वाची एक थंडगार वेदना,
सर्वांगातून सरपटत जाते,
मनाचे वारूळ व्यापून टाकते.

* *

माणसाच्या दुनियेमध्ये : शशी दाभोळकर

माणसांच्या दुनियेमध्ये दान कुणी दिले नाही
गंगेमध्ये उभा राहून थेंब पाण्याचे प्यालो नाही.
जगण्यासाठी जिंदगीमध्ये श्वास सुद्धा घेतला नाही
चालता चालता इथं आलो थांबा कुणी म्हटले नाही.
दिंडी पुढे निघाली आता पायी मिठी गुंतवू नका
हरामांच्या दुनियेमध्ये आत्माराम राहिला मुका.
आत्माराम राहिला मुका त्याचा केला अबीर बुका
हाची मान घडला देवा जन्म गेला वाया फुका. * *

भोगपुरुषांची जमात : शशी दाभोळकर

भोगपुरुषांनी फडकवलेली प्रश्न निशाणं
आता खेचलीच पाहिजेत पायदळी.
गल्लोगल्लीतील त्यांचे स्मृतिस्तंभ खोदून
गाडून टाका ।
एक हाती सप्तपाताळी ।।
सप्तपाताळी सुद्धा ठेचा त्यांची आगाऊ मस्तके
तोडा वेताल जोमा आणि आक्रमक हात
नरभक्ष्यक भोगपुरुषांच्या वंशावळी
आणि धर्मकांड पत्रावळीतील गणगोत
छाटून टाका । जाळून टाका ।। प्रतिमा सोवळी ।।।
मोडून टाका । तोडून टाका ।। कामदी जमात ।।।

* *

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाऊसाहेबांची बखर

उषा मा. देशमुख

शिवपूर्वकाळ, शिवकाळ आणि पेशवेकाळ- या जवळजवळ दोन–तीन शतकात मराठी बखरवाङ्मयाची निर्मिती झाली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हे बखर-वाङ्मय संशोधकांनी शोधून काढले. हे संशोधन काही विशिष्ट हेतू मनात बाळगून केले गेलेले असले तरी आजच्या संदर्भात तो हेतू गौणस्वरूपाचा ठरतो कारण इतिहासाची कितीतरी अन्य साधने आज उपलब्ध झाली आहेत इतकेच नव्हे तर इतिहासाचे शास्त्रही आज घटकेला निर्माण झालेले दिसते. त्यामुळे आज बखरींचा अभ्यास करताना, इतिहासाचे महत्त्वपूर्ण साधन म्हणून त्या बखरींचा अभ्यास करणे चुकीचे ठरले आहे. एकेकाळी इतिहास संशोधक पूर्वदिव्य इतिहासाचे भांडार या दृष्टीने बखरींकडे बघत होते त्यातून आपल्या विवेचनाच्या पुष्टयर्थ बखरींचा हवाला देत होते. आज कालमानानुसार बखरींचे मूल्यमापनही एका वेगळ्या दृष्टीने होणे आवश्यक ठरते व ते तसे करण्याचा प्रयत्न, काही बखरींच्या संपादनातून सिद्ध झाला आहे.

इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी यांना जोडणारा दुवा म्हणजे बखरवाङ्मय असाही विचार झाला तर मराठी ऐतिहासिक कादंबरीची पूर्वपीठिका म्हणजे बखर हीही दिशा बखरवाङ्मयाला दाखविण्यात आली. चरित्रवाङ्मयाचा प्राचीन धागा म्हणूनही बखरींचा विचार झाला तर आख्यान वाङ्मयाचे वेगळे रूप म्हणूनही बखरींकडे बघण्यात आले. म्हणजे बखर-वाङ्मयाचे स्वतंत्र अस्तित्व नाकारून ती कोणकोणत्या पांगुळगाड्याने चालू लागली हेच शोधण्याचा प्रयत्न सतत होत राहिला व होत आहे. जवळजवळ दोन तीनशे वर्षे निर्माण होणाऱ्या वाङ्मयातील सातत्य व एक विशिष्ट रूपप्रकार असे स्वतंत्र स्थान बखर-वाङ्मयाला नाकारून तो वाङ्मयप्रकार म्हणजे इतिहास + चरित्र + वाङ्मय यांची एक गुंफण होय. अशा दृष्टीने आजपर्यंत बखर वाङ्मयाचा विचार केला गेला. वाङ्मयाचे आपले रचना वैचित्र्य जसे सिद्ध केलेले आहे तसेच आपले रूपवैशिष्टचही निश्चित केलेले आहे हे दोन–अडीचशे बखरींवरून दिसून येईल. केवळ इतिहासाचा साधनग्रंथ म्हणून किंवा केवळ चरित्रवाङ्मयाचा एक प्रकार म्हणून किंवा केवळ मुसलमानी नामे, तवारिखा यांची नक्कल करणारा वाङ्मयप्रकार म्हणून किंवा आख्यान परंपरेचा एक अविभाज्य घटक म्हणून बखर वाङ्मयाकडे न बघता एक प्राचीन व मध्ययुगीन गद्यवाङ्मयाचा स्वतंत्र रूपप्रकार म्हणून बखरींची परीक्षा करता येणे सहज शक्य आहे.

बखरकारांच्या बखर लेखनामागे जसे विशिष्ट प्रयोजन होते तसेच त्या वाङ्मय संशोधनातही एक विशिष्ट प्रयोजन सिद्ध झालेले स्पष्ट आहे. त्यामुळे आजपर्यंत ज्या विविध संपादकांनी काही महत्त्वाच्या बखरींचे संपादन केले त्यांना एकतर बखरीत इतिहास किती उतरला, चरित्र कसे रेखाटले गेले व वाङ्मयीन गुण किती अवतरले आहेत याचीच मोजदाद करणे भाग पडलेले आहे. अशा वेळी इतिहासाशी काय किंवा चरित्राशी काय जर बखरींनी इमान राखले नसेल तर संपादक नाराज झालेले दिसतात अशा वेळी मूळ बखरी जशा उपलब्ध झाल्या तशाच विचारात घेतल्या असत्या तर बखरवाङ्मय समालोचनात अशी एकांतिक विचार-सरणी निर्माण झाली नसती. अर्थात इतिहास, चरित्र आणि वाङ्मयीन गुण बखरीतून शोधत असताही त्या बखर वाङ्मयाची एका परीने तपासणीच केली जात होती. पण त्यामुळे एकच दुर्लक्षित असे अंग बखरीं-बाबत दिसून येते ते म्हणजे ज्या प्रमाणात मराठीच्या बखर संपादकांनी बखरींचे ऐतिहासिकत्व, चरित्र यांचे बारकाईने अवलोकन केले त्याप्रमाणात त्या बखरकारांनी समजावून घेतलेले दिसत नाही. ज्या काळात ज्या परिस्थितीत आणि ज्या प्रयोजनामुळे या बखरी सिद्ध झाल्या त्यातून त्या बखरकारांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व शोधण्याचा प्रयत्न केला गेला नाही. त्याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले असे नव्हे तर ज्या प्रमाणात त्या

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लेखकांचा विचार करावयास हवा होता त्या प्रमाणात तो झालेला नाही. पूर्वग्रहांचे गाठोडे बाळगून व 'सर्व हेतू पूर्ण करणारी बखर आहे' असे समजून तिची परीक्षा केली गेली. त्यामुळे बखरींचा लेखक कोण ? हा जवळ जवळ सर्व बखरींचा वादविषय ठरला. युद्धप्रसंगात पाल्हाळ जाणवला व कालविपर्यासाचा दोष दिसून आला. राज्याभिषेकांच्या वर्णनात घटना पुढेमागे झालेल्या आढळून आल्या. आज केवळ अशा ऐतिहासिक दृष्टिकोणातून बखरींचे समालोचन करून भागणार नाही तर तिचे वाङ्मयीन मूल्यही सर्वप्रथम लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे बखरीतील इतिहास व चरित्र गृहित धरून तिचे वाङ्मयीन विशेष लक्षात घेऊन त्या कालखंडातील वाङ्मयीन प्रवृत्ती व प्रेरणा गद्य वाङ्मयातून कशी पारदर्शक झाली हे प्रामुख्याने बखरवाङ्मयाच्या अभ्यासातून दिसून येणार आहे. उदाहरणादाखल बखरवाङ्मयात सर्वश्रेष्ठ ठरलेली व आजपर्यंत मान्यता पावलेली 'भाऊसाहेबांची बखर' घेता येईल.

बखरवाङ्मयात भाऊसाहेबांच्या बखरीचे वैशिष्टय काही वेगळेच आहे. ही बखर एका समकालीन लेखकाने लिहिली. इतकेच नव्हे तर तो पेशव्यांच्या अन्तर्गृहापर्यंत वावरलेला व शेवटी पानिपताच्या युद्धतळावरही गेलेला असावा असे वाटू लागते. पानिपताची लढाई इ. स. १७६१ मध्ये जानेवारी ते मार्च या कालखंडात झाली व या लढाईनंतर अवघ्या दोन वर्षांनी म्हणजे इ. स. १७६३ मध्ये ही बखर लिहिली गेली. या बखरीचे मूळ 'भाऊसाहेबांच्या कैफीयती'त आहे असे म्हटले जाते. पण कैफियत ही भाऊसाहेब पेशवे निजामाचा पराभव करून पडदुऱ्याहून उत्तरेत गेले या प्रसंगापासून सुरू झाली आहे. उलटपक्षी भाऊसाहेबांच्या बखरीत कुंभेरीचा वेढा (इ. स. १७५२) केव्हा, कसा व कोणी दिला या प्रसंगापासून सुरू होते व भाऊसाहेब उत्तरेत जातात या प्रसंगावर भाऊसाहेबांच्या बखरीचा मध्य येतो. त्यामुळे भाऊसाहेबांची कैफियतीत थोडाफार बदल करून 'भाऊसाहेबांची बखर' लिहिली गेली हे किती तरी इतर अन्य पुराव्यांनी खोडून काढता येईल पण ते आपले लक्ष्य नव्हे. भाऊसाहेबांच्या बखरीचा लेखक कुणाचा पक्षपाती ? यावरही बरेच वादंग माजविले गेले आहे. कधी तो शिंद्यांचा पक्षपाती ठरविला गेला. कधी राघोबाचा पक्षपाती ठरविला गेला. पण त्याचवेळी त्याने घडविलेले संपूर्ण मानवीजीवनदर्शन मात्र संपादकांच्या हातून निसटून गेलेले दिसते.

ही बखर ज्या काळात निर्माण झाली तो काळ म्हणजे मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने अंधारयुगाचा काळ होता. संतकवींची भावकविता संपुष्टात आली होती. आजपर्यंत संस्कृत कवितेपासून फुटून निघण्याचीजी धडपड मराठी कविता करीत होती ती पुन: संस्कृतच्या वळणाने रघुनाथपंडित, विठ्ठल कवी, सामराज, मोरोपंत यांनी वळविली. ओवी आणि अभंग जाऊन त्या ठिकाणी श्लोकरचना होऊ लागली. याच काळात पोवाडे आणि लावण्या यांच्या रचनेला उधाण आलेले दिसते. म्हणजे एकीकडे संस्कृत कवितेपासून फुटून निघण्याची पारंपारिक धडपड दिसून येते तर दुसरीकडे श्लोकबद्ध रचनेतून संस्कृत कवितेचे वळण गिरविलेले दिसून येते. भक्तीपेक्षा वैदग्ध्याला आणि आत्मानुभूतीपेक्षा पांडित्यप्रदर्शनाला पेशवेकाळात ऊत आलेला आहे. कवितेचीच जर ही अवस्था तर गद्याविषयी बोलणेच नको. यादवकाळ ते पेशवेकाळ या प्रचंड विस्तारात गद्यवाङ्मयाची हिरवळ फारच थोडी अस्तित्व टिकवून जिवंत राहिलेली दिसते. महानुभाव गद्यलेखक एकनाथांचे गद्य, फादर स्टिफन्सचे गद्य व बखर गद्य असा कालानुक्रम आहे. बखरवाङ्मयाबरोबरच दप्तरवाङ्मयाचेही संशोधन आज उपलब्ध आहे. इतिहासाचा कोरडा आणि वस्तुनिष्ठ तपशील पुरविणाऱ्या दप्तरवाङ्मयांच्या संदर्भात मराठी बखरी पुन्हा एकदा उठून दिसतात. बखरकार त्या त्या बखरीतील व्यक्तींशी तादात्म्य पावून एक नवे व सुसंगत असे भावविश्व निर्माण करीत असतो. एखाद्या छायाचित्रकाराने एखादे चित्र टिपून घ्यावे तसे त्याचे वर्णनातील कसब असते तर चित्रपटातील प्रसंगाप्रमाणे त्या बखरींची बांधणी झालेली असते.

१७५२ ते १७६१ या कालखंडातील प्रसंग, व्यक्ती आणि राजकारण भाऊसाहेबांच्या बखरीच्या बखरकारासमोर आहे. प्याद्याचा फर्जी नजीबखान रोहिला कसा झाला हे त्याचे निर्मितीमागील प्रयोजन आहे. ही त्याच्या बखर निर्मितीची मर्यादा ओलांडून हा बखरकार मानवी व्यवहारांवर, वागण्याच्या पद्धतीवर व स्वभावावर एकसारखा प्रकाश टाकताना आढळून येतो. भाऊसाहेबांच्या बखरीचा बखरकार हा माणसामाणसात रंगलेला आहे. या माणसांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रेखाटनातून तो तत्कालीन समाज आपल्या डोळ्या-समोर उभा करतो. त्या समाजाचे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय हे सारे व्यवहार तो साक्षात करतो व या सर्वांच्या साह्याने मानवी जीवन-दर्शन घडवितो. यासाठी उदाहरणच घ्यायचे झाले तर हे दाखविता येईल. भाऊसाहेब पेशवे हे या बखरीचे एका अर्थी नायक आहेत. ज्या संदर्भात भाऊसाहेबांच्या व्यक्तिचित्रणाला या बखरीत महत्त्व मिळते त्या संदर्भात भाऊसाहेबांची अर्धांगी पार्वतीबाईसाहेब हिला मिळालेले नाही. ही घटना केवळ योगायोगाने झाली असे नाही. व्यक्तिदर्शनातील बारकावे या बखरकाराजवळ आहेत. मग असे का व्हावे? पानिपतच्या पळामध्ये पळतपळत आलेली पार्वतीबाई, तिच्या हालअपेष्टा, दिल्लीला भाऊसाहेब नाहीत हे ऐकून तिची झालेली तडफड बखरकार वर्णन करीत नाही. किंबहुना ती त्याला महत्त्वाची वाटत नाही. जी गोष्ट पार्वतीबाईची तीच नाना फडणीसांच्या मातोश्रींची व पत्नीची झालेली आहे. स्त्रियांच्या व्यक्तिरेखा अतिशय सुसंगत वर्णन करणारा हा बखरकार वरील स्त्रियांकडे दुर्लक्ष का करतो? याचे कारण म्हणजे या स्त्रियांनी राजकारणी पुरुषांच्या जीवनात जरी भाग घेतलेला असला तरी राजकारणापासून त्या फार दुरांतरावर आहेत याची जाणीव बखरकार ठेवतो. उलटपक्षी हणसया, मलका-जमाती, चंदाजयानी, गौतमाबाई, गोपिकाबाई, भागीरथीबाई आणि कासिबाई या स्त्रियांची व्यक्ति-चित्रे अतिशय चपखल व नीटनेटकी निर्माण झाली आहेत. ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे.

भाऊसाहेबांच्या बखरीत या विविध स्त्रियांनी बजावलेली कामगिरी फार महत्त्वपूर्ण आहे. राज-कारणातील तणावाच्या प्रसंगी शत्रू चाल करून असता, आपसातील भेदभाव विकोपाला गेला असता स्त्रियांनी केलेले जावसाल व त्याला त्या त्या राजकारणी मुत्सद्यांनी दिलेले अनुमोदन व त्यातून त्या त्या प्रसंगाचा सोडवलेला गुंता मूळ बखरीतून बघण्यासारखा आहे. उदा० सुज्याउदौल्ला आणि नजीबखांन रोहिला यांनी संगनमत करून दत्ताजी शिंदे यांना एक करोड रुपयांच्या आशेत गुंतविले व परस्परांच्या भेटीसाठी भागीरथीच्या पुलावर बोलाविले त्यांवेळी दत्ताजी शिंदे यांची पत्नी भागीरथीबाई यांनी 'येकांनी जाऊन भीड सोडून जावसाल केला' होता. हे सांगण्यास बखरकार विसरत नाही. प्रत्येक शब्द महत्त्वाचा वाटावा व त्यातून त्या स्त्रीची कल्पना यावी असे वर्णन बखरकार करतो. ती म्हणते "आबदुल आली दुराणी याची फौज च्याळीस हजार आटक उतरून लाहूर प्रांती आली. आमची फौज होती ती काही उधलली. काही पंजावात होती तिची गत काय जाहाली ती समजत नाही. हे वर्तमान प्रसिद्धच ऐकत आहा. दुसरे आमदखान लंगडा पठाण दाहा हजार पंधरा हजार फौजेनिसी जमून रोहिला व ते येक विचारे आहेत. सुज्यातदौलाहि पनास हजार फौजेनिसी (त्याची) कुलीही दैत्याची व तीनसे तोफा घेऊन पुलावर उतरलाच आहे. नजीबखान वीस हजार फौज व दाहा हजार पायदळ, प्रत्यक्ष वैदूरी, युद्ध करीतच आहे. आसे चौहूकडून जाले पसरले आहे. तुम्ही आपले ऐश्वर्याने व हिमतीने व ईरषेने धुंद जाहाला आहा. परंतु आम्ही व्हावे इतके मात्र उरले आहे. प्रत्यक्ष वैरी नजीबखान याचे फौजेत पुलावर जाऊन भेटावे ही मसलत, हा मनसोका, केवल नेणते मूल असेल त्याचे (फार तर) ध्यानात न येईल आणि तुम्हास काळाची झापड कसी पडली हे न कळे." या भागीरथीबाईच्या उद्गारातील प्रसंगनाटच उलगडून बघण्यासारखे आहे. तिचा धोरणीपणा, पतीच्या वागण्यातील चुका आणि एकूण राजकारणाची जाण बखरकार स्पष्ट तर करतोच पण त्यावरोबर दत्ताजी शिंदे यांचा भोळा स्वभाव कार्याकार्यविवेकाचा अभाव आणि केवळ स्वतःच्या शौर्यावर निर्भर राहण्यातील धोका बखरकार दाखवून देतो व त्यामुळे या प्रसंगाला काही वेगळाच नाट्यगुण प्राप्त होतो.

विशिष्ट राजकीय प्रसंग, त्या प्रसंगातील घटना, त्या घटना ज्या व्यक्तींच्या संदर्भात घडल्या त्या व्यक्ती व तो प्रसंग ज्या वातावरणात आणि काळात निर्माण झाला तो काळ आणि ते वातावरण हे सर्व एकाचवेळी जिवंत करण्याचे कसब बखरकाराच्या ठिकाणी आहे. त्यामुळे संपूर्ण मानवी जीवन तो आपल्यापुढे साक्षात करतो व या सर्व वर्णनाला मिळून जातो तो एक निखळ, हळुवारपणा. माणसांची परस्पर नातीगोती, कौटुंबिक स्नेहसंबंध, आत्मस्वकीयांचे परस्पराविषयीचे हेवेदावे यांना देखील एक कौटुंबिक जिव्हाळ्याचे सततचे आवरण मिळालेले दिसते.

दत्ताजींच्या वधानंतर जनकोजी शिंदे घायाळ अवस्थेत सैन्यासह पळ काढतात. त्याचे वर्णन बखरकार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे करतो, " जनकोजी शिंदे यास घोडीयावर बसावयास अवसान पुरेनासे जाले. मग खेडियातील खाटले काढून खाटल्यावर निजऊन चालविले इतकियात दुराणी याणे गडबड केली. खाटले भुईस उतरावयास फुरसत पडली नाही. तेव्हा उभियानेच खाटले टाकीले. जनकोजी सिंदे जखमी भारी. शरीरास परम दुःख जाहाले. मागनी घोड्यावर खाटले सुद्धा घालून तीन-चार कोश परियंत निघोन आले. सायंकाल जाहाला...वाटेने लोकास जनकोजी सिंदे पुसत की, 'काकासाहेबांची गत काय जाहाली ?' लोकांनी दत्ताजी सिंदे पुढे गेले म्हणोन चाळवीत चाळवीत बुणगियात आले. कचेरीचे डेन्यानजीक वाडापुढे खाटले उतरले. तो रामजीपंत दिवाण व रूपराम कटारी धावत आले. त्याज समावेत पाचसात मशालीही होत्या. जनकोजी सिंदे येईल तो पावेतो वायकास दत्ताजी सिंदे यांची अवस्था कळली नव्हती. वाडांत वर्तमान कळताच भागीरथीबाई व जनकोजी सिंदे यांची स्त्री कासीबाई अशी उभयंता महाराष्ट्रधर्म विसरून धावत वाडाचे बाहेर आलीं तो जनकोजी सिंदे खाटल्यावर घायाळ पाहिले. तोंड उघडून पाहिले तो जनकोजी सिंदे यांणी डोळ्यांस पाणी आणून चुलतीस विचारिले की 'बाई काका कोठे आहेत ?' ते समयी भागीरथीबाईस पुरते उमगले की, पाटील निश्चये रणात पडले ! बाईस दुखाचा उमाडा आला. मागनी विवेक केला की, जात्यातील रडती, सुपांतील हसती."

भागीरथीबाईचे वीरपत्नीला साजेसे वागणे. तिने दाखविलेला संयम, धैर्याची पराकाष्ठा आणि प्रसंगाची भीषणता ओळखून तिची असलेली वागणूक या सर्व बारीकसारीक तपशीलातून बखरकार सर्व अशा प्रकारच्या युद्धकथेचे नाणेबाणे विणतो. अर्थात युद्ध-कथेतील केवळ भीषणता त्याला अभिप्रेत नाही तर मानवीजीवनातील हळूवारपणाही तो दृष्टिआड होऊ देत नाही. संपूर्ण कथानकाकडे बघण्याची त्यांची एक वेगळी दृष्टी आहे. एक भूमिका आहे. एक पद्धती आहे. त्यामुळे आजपर्यंत इतिहासातील दुर्लक्षित राहिलेल्या स्त्रिया या बखरीतील फार मोठ्या महत्त्वाच्या व्यक्ति-रेखा ठरतात. आठरा वर्षाच्या कासीबाईने दाखविलेला पोक्तपणा, एवढाले जीव गेले दौलतीची आस्था कोणास आहे ? असाही जाबसाल ती करते व त्यातून प्राप्त परिस्थितीला तोंड देण्याची तिची धडपड सूचित होते.

तत्कालीन चालीरीती, समाजातील व्यवहार आणि युद्धनीती याहीबाबतीत बखरकार जागरूक असलेला दिसतो. 'सतीची चाल, युद्धातील शकुन अपशकुनांचे महत्त्व, तत्कालीन दस्तुर, होळी, दसरा, दिवाळी, त्रिपुरी पौर्णिमा, रंगपंचमी या सणांची वैशि-ष्ट्ये, युद्धाला निघताना, युद्ध खेळताना व युद्धावरून परत आल्यानंतरचे सर्व रीतीरिवाज याचे फार बार-काईने बखरकार वर्णन करतो व त्यातून संपूर्ण तो कालखंड डोळ्यासमोर साक्षात होतो. केवळ राजकारण नव्हे ! केवळ द्वारकेप्रमाणे दिल्ली नांदत होती. हा बखरकारानें पुरविलेला तपशील, कौरवपांडव यांच्या घरकलहाप्रमाणे निर्माण झालेला गृहकलह या तपशीला-मधून बखरकारासमोर महाभारतातील कौरवपांडव यांच्यातील युद्धाचा आदर्श होता ही गोष्ट स्पष्ट दिसून येते. तसेच मुक्तेश्वराच्या आदि–सभा–वन–विराट-पर्वांचे सखोल वाचन बखरकाराने केलेले दिसते त्यामुळे या बखरीतील प्रसंगांची आणि घटनांची मांडणी करताना त्याच्या मनावरील महाभारताचा ठसा स्पष्ट होतो. जवळजवळ अडीचशे ऐतिहासिक व्यक्तींचा उल्लेख बखरकार करीत असता त्या त्या व्यक्तीचे अपरिहार्य असे युद्धातील स्थान विसरत नाही त्यामुळे खंडेराव होळकर किंवा जानु भिताडचा या व्यक्तीही लक्षणीय अशा उतरतात.

ऐतिहासिक सत्यता जशी बखरकाराने शेवट-पर्यंत सांभाळली आहे तशीच चरित्रातील अचुकताही त्याला उमगलेली आहे. महीपतीची चरित्रात्मक कविता या बखरकाराच्या डोळ्यासमोर आहे आणि वाङ्मयीन-मूल्याची स्पष्ट अशी सुजाण ओळख बखरकाराने दाखविली आहे. त्याने त्याने निर्माण केलेल्या प्रसंगातील नाट्य, त्यांचा नीटनेटकेपणा व जिवंतपणा हा तो प्रसंग ज्या व्यक्तींच्या संदर्भात घडला त्या व्यक्तींना जिवंत करण्यासाठी सर्वार्थाने कारणीभूत ठरतो व व्यक्तिदर्शनाची सुजाणता पेशवेकाळात फक्त बखर-गद्यात सापडते हे विशेष होय ! कारण समाजाच्या काय किंवा देशाच्या काय अवनतीच्या काळात निर्माण झालेले वाङ्मयही काही प्रमाणात अवनतीच्या दिशेने प्रवास करणारेच निर्माण होते असे आजपर्यंतच्या

[पृष्ठ ३९१ वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बालकवी—एक आकलन

सुशीला पाटील

निसर्गकवी

आधुनिक मराठी कवितेत निसर्गकवी म्हणून बालकवींचे—[त्र्यंबक बापूजी ठोमरे. जन्म : १३ ऑगस्ट १८९० मृत्यू : ५ मे १९१८]—स्थान अद्वितीय मानले जाते. निसर्गाची विविध रूपे आपणांस त्यांच्या काव्यात दिसतात. बालकवींच्या काव्यातील निसर्गाचा व्याप पाहून निसर्गाच्या बाह्यरूपदर्शनाने बालकवी अक्षरशः वेडे होत असावेत असे वाटते. लहानग्या फुलवेलीपासून तो थेट आकाशातील चंद्रसूर्यापर्यंत त्यांची निसर्गवेडी वृत्ती स्वैर विहार करीत असलेली दिसते. पौर्णिमा, अरुणोदय, शुक्रोदय, तारकांचा उदय, संध्या—रजनी, संध्यातारक अशा कितीतरी निसर्गावस्था त्यांनी आपल्या काव्यात चिरंतन करून ठेवल्या आहेत. इवलेसे तृणपुष्प, श्रावणमासातील निसर्गरूप, निर्झर अशा नित्यपरिचित निसर्गातील सौंदर्यही उत्कटतेने अनुभवून तेवढ्याच उत्कट शब्दचित्रातून त्यांनी ते रसिकांपुढे उभे केले. त्याच्या बहुसंख्य कविता निसर्गपर असल्यामुळे 'प्राधान्येन व्यपदेश...' या न्यायाने त्यांना निसर्गकवी म्हटले जाते. बालकवींच्या निसर्ग काव्याच्या हृद्यतेचे मूळ कवीच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीत, निसर्गाच्या यथातथ्य चित्रणात, नादमधुर शब्दयोजनेत तर विलोभनीय रंग—संगतीत असल्याचा निर्वाळा समीक्षकांनी दिलेला आहे. पण तो पुरेसा आहे असे वाटत नाही.

निसर्गाच्या पडद्याआड

बालकवींच्या काव्याचे स्वरूप न्याहाळून पाहिल्यास त्यात निसर्ग वर्णनाने बराचसा भाग व्यापलेला दिसत असला तरी या वरवरच्या हिरव्यागार निसर्गाची पाळेमुळे भूगर्भात असण्याऐवजी मानवी भावसृष्टीत रुजलेली दिसतात. कित्येकदा कवीचा आत्मानुभव निसर्गातील एखादे प्रतीक घेऊन मूर्त झालेला दिसतो, तर अनेकदा निसर्गाचा वा प्रतीकाचाही आडोसा न घेता,—

कोठुनि येते मला कळेना उदासीनता ही हृदयाला

अशा साध्या, सरळ नि म्हणूनच अधिक परिणामकारक शब्दांतून कवी रसिकांशी हृदयसंवाद साधू लागतो.

मानवी भावबंध

बालकवींच्या निसर्गगीतांच्या अंतरंगात प्रवेश करताच तेथील निसर्गाचा पडदा अलगद दूर होतो आणि मानवी भावजीवनाचीच विविध आकर्षक रूपे सामोरी येतात. मानवी व्यवहाराची सचेतन हालचाल प्रतीत होते. अनेक मानुष भावबंध बालकवींनी निसर्गाच्या आश्रयाने काव्यात चिरंजीव करून ठेवल्याचे प्रत्ययास येते.

दिवसयामिनी परस्परांचे चुंबन घेतात ।
अनुरागांच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांना

अशी शृंगारिक उत्प्रेक्षा पूर्वेच्या रक्तिमेवर ते करतात; हळूहळू पूर्वेकडून फाकणारे तेज साऱ्याच दिशांना उजळून टाकते. हा प्रकाश—सोहळा पाहण्यास बालकवी थेट आकाशात उड्डाण घेतात—दिशादिशात डोकावतात आणि—

तेजाने न्हाणिते जगाला कोण सखे बाई,
नवल अगाई ! तेजोमय तू ! तेजोमय मीही !

दिग्वनितांचा असा साक्षात संवादच ते वाचकांना ऐकवतात.

आकाशातून बालकवी परत पृथ्वीकडे दृष्टिक्षेप टाकतात. अरुणोदयाने पृथ्वीवर आलेला प्रातःकालीन तजेला कल्पनाचक्षूंनी टिपतात आणि

'परंतु ही बघ भूदेवी तर वेडावुनि गेली'

असे म्हणून भूदेवीला एखाद्या धुंद प्रणयिनीच्या रूपात साकार करतात. सकाळच्या कोवळ्या सूर्यकिरणांनी दंवबिंदू शोषले जातात. या निसर्गसत्याच्या आधारेच पृथ्वीचे प्रणयिनीचे चित्र पुढे रेखाटू लागतात—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दंवबिंदूचा नव्हे नव्हे ! हा पडदा लज्जेचा
मुग्धपणाचा, बालपणाचा कोमल हृदयाचा
निजवदनाहुनि या प्रौढेने दूर पहा केला

एका भावगम्य कल्पनाचित्राला बालकवी निसर्गाच्या विशिष्ट अवस्थेत चपखल उभे करतात.

'संध्या—रजनी' या कवितेचा प्रारंभच—

अस्तगिरीच्या अभिनव कुंजी निजला निजनाथ
बघता बघता त्यास रंगले वारुणीचे चित्त

या शब्दात करून पश्चिम—दिशा व सूर्य यांच्या प्रणय—रम्य दृश्याला मूर्त रूप ते देतात.

सूर्य दृष्टिआड झाला तरी बराच वेळ सांज फुललेलीच राहते—पश्चिमेच्या गालावरील लाली कायम रहाते तेव्हा—

थक्क होऊनी दिशा म्हणाल्या काय मोहिनी ही
प्रेमसमाधी अजुनि खुळीची या उतरत नाही.

अशी दिशा—दिशांची कुजबूज होते. तिची चाहूल पश्चिमेला लागते. सूर्य गेल्याचे भान तिला होते अन् ती उदासते. अशावेळी या मैत्रिणी तिचे सांत्वन करतात—

किती पश्चिमे ! आता त्याचे चिंतन करिशील
दृष्टि लावुनी अशीच बसशिल सांग किती वेळ
खिन्नपणा हा पुरे ! पुरे ग अश्रूंची माळ
उद्या बरे का तो राणीला अपुल्या भेटेल.

चंद्राच्या चंद्रिकेने यामिनी धवळिली जाते हे लक्षात घेऊन—

'धवल चंद्रिके दे आलिंगन दिव्य यामिनीला
बहिणी बहिणी तुम्ही सुखाने चंद्राशी वेळा

असे म्हणून चंद्रिका व यामिनी या दोन बहिणींचे प्रेम त्यांच्या परस्पर दृढ आलिंगनातून बालकवी दाखवतात तेव्हा तर या स्त्रिया नसून केवळ ही एक निसर्ग स्थिती आहे हे वाचक जवळ—जवळ विसरून गेलेला असतो.

मध्यरात्रीच्या निवांत वेळी सारे विश्व निद्राधीन झालेले असते हे लक्षात घेऊन—

'रजनी देवी ! गात बैसली अंगाई गीता' असे म्हणून विश्वाला झोपवीत असलेल्या रजनीला अंगाई—गीत गाणाऱ्या वत्सल मातेच्या रूपात ते पाहतात.

हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती
फुलराणी ही खेळत होती.

यात फुलराणीच्या निमित्ताने एका अल्लड, खेळकर बालिकेचे चित्र बालकवी चितारतात—रविकराशी होणाऱ्या तिच्या विवाह सोहळ्याचे यथासांग शब्दचित्र रेखाटतात. यात फुलराणी—रविकराऐवजी दुसरी कोणतीही नायक—नायिकांची नावे घातली तरी या मंगलमय विवाहविधीत कोणताच व्यत्यय येत नाही. इतके हे भावचित्र परिपूर्ण आहे.

असे हे बालकवींच्या बहुसंख्य निसर्गकवितांचे आंतररूप आहे. नानाविध भावबंधने निसर्गाच्या सदा-मनोहर अशा लोभसवाण्या बुरख्यातून ठायीठायी डोकावताना दिसतात. निसर्गापेक्षा या बहुविध भाव-बंधनांवरच कवीचा जीव अधिक जडलेला दिसतो. आणि मग त्यांच्या काव्यातील निसर्गचित्रण दुय्यम वाटू लागते. त्यांची निसर्ग कविता वाचताना तिचे निसर्ग-रूप नकळत गळून पडते आणि उत्कट भावचित्रेच मन:चक्षूसमोर आकारू लागतात.

(पृष्ठ ३८९ वरून)

मराठी वाङ्मयाच्या इतिहासावरून दिसून येते. अशा अंधार युगात निर्माण झालेले बखरवाङ्मय व त्या बखरवाङ्मयातील कौस्तुभ म्हणजे भाऊसाहेबांची बखर ही अपवादादाखल गृहीत धरता येईल. याच काळात मराठी कवितेने घेतलेली वळसेवळणे व त्यामुळे तिला आलेला पसरटपणा लक्षात घेता बखरवाङ्मयाने गद्य-वाङ्मयाची नुसती परंपरा अनुसरली नाही तर यादव-कालीन गद्यातील अपुरेपणा नाहीसा करून इतिहास चरित्र आणि साहित्य यांचा अपूर्व संगम घडवून एक नवा वाङ्मयवंध निर्माण केला.

□ □

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समासोक्ती अलंकार

बालकवींच्या काव्याचे हे वैशिष्टयपूर्ण स्वरूप पाहून समासोक्ती अलंकार आठवतो. विशिष्ट शब्द-योजनेच्या द्वारा प्रस्तुत अर्थाशिवाय अप्रस्तुत अर्थाचाही बोध या अलंकारात होत असतो. या अलंकाराचे प्रसिद्ध उदाहरण–

आकाशांत पहा कांते ! शोभा ही हृदयंगमा ।
चुंबितो रक्त होत्साता प्राचीचे मुख चन्द्रमा ।

–हे आहे. या ओळीत वरवर पाहता नायक–नायिके-जवळ चंद्रोदयाचे निसर्ग वर्णनच करीत आहे. पण त्यातून योजनापूर्वक तरीही जणू नकळत नायक–नायिका व्यवहाराचे सूचन होत आहे. समासोक्ती अलंकाराचा हृद्य विशेष म्हणजे यातील अप्रस्तुत असा सूचित अर्थच अधिक आस्वाद्य असतो आणि तोच कवीचे लक्ष्य असतो. असला हा समासोक्ती अलंकार बालकवींच्या निसर्गगीतांत वारंवार चमकतो. निसर्गाच्या माध्यमातून स्फुरणारा मानुष व्यवहारच अधिक आकर्षक वाटतो. निसर्गात दडलेले सौंदर्य बालकवी आपल्या कवी–दृष्टीने टिपतात, पण ते तेथेच स्थिरावत नाहीत. तर त्या निसर्गावर मानवी भावनांचे सिंचन करतात–भावगर्भ प्रसंगांचा निसर्गावर आरोप करतात. त्यामुळे त्यांची निसर्ग–चित्रे केवळ जड, वस्तुनिष्ठ न राहता ती नानाविध भावभावनांची जिवंत रूपे ठरतात. मानवी अनुभूतीच्या कक्षेतील कितीतरी वेगवेगळी भावदृश्ये निसर्गाच्या रूपात बालकवींच्या काव्यात भेटतात.

परंतु विविध भावभावनांची वीण असलेली ही निसर्गकविता नेमकी कुठेच स्थिरपद झालेली दिसत नाही. एकटी 'संध्यारजनी' घेतली तरी तीत पतिपत्नी, प्रियकर–प्रेयसी, मैत्रिणींचा मेळावा, लहानग्या अल्लड बालिका, दिग्वनितांचे महिलामंडळ, बहिणी–वहिणी, आई–मूल अशा कितीतरी भावच्छटा संध्याकाळच्या नि रात्रीच्या रूपात रसिकांपुढे पेश केल्या जातात. पण यातील कवीचे नेमके लक्ष्य हेरता येत नाही. कवीचा अचूक आशय पकडता येत नाही. विशिष्ट निसर्गावस्था व विशिष्ट भावावस्था यांची सांधेजोड झाली की जणू कवीचे काम संपते. त्यामुळे या निसर्गगीतांत बालकवी तटस्थ वाटतात. येथे ते समरसून काहीच सांगत नाहीत. उत्तुंग कल्पकतेची साथ लाभलेला, हळुवार अंतःकरणाचा भावकवी स्वच्छंदपणे पण अलिप्तपणे इतस्ततः वावरताना या कवितांत दिसतो.

पण कवी जेव्हा स्वतःचाच एखादा भाव शब्द-बद्ध करतो तेव्हा आत्यंतिक आत्मनिष्ठेने ती कविता चिरंतन ठरते. अशाही कवितात निसर्ग येतोच. पण त्या निसर्गावर कवीच्या एकाच एका भावस्थितीचे इतके तीव्र आक्रमण होते की इतर कवितांतील विविध नातीगोती नि भावबंध यांना त्यात अवसर मिळत नाही. निसर्गाची व्याप्तीही संकुचित होते. निसर्ग केवळ प्रतीक म्हणूनच येतो.

प्रतिकात्मक कविता

त्यांच्या निसर्गगीतांपेक्षाही त्यांच्या प्रतीकात्मक कविता अधिक हृदयस्पर्शी ठरल्या आहेत. या कवितांमध्ये एखादाच बालविहग, एखादाच पारवा, एखादेच पाखरू–कवीच्या अंतरंगाचे साक्षी म्हणून त्याच्या व्यक्तिगत भावविश्वाचे सारे रंग नि गंध घेऊनच रसिकांकडे झेपावत असलेले आपणास दिसते. सखोल भावानुभूती रेखाटणाऱ्या या कवितांत स्वच्छंद कल्पनाविलासाला जणू अडसर घातला जातो ! एखादा 'बालविहग' पाहून कवी त्याच्याशी एकरूप होतो न होतो तोच स्वतःचे जडत्व स्मरून–

'चित्त वाटते तरल तुझ्यापरी खगबाळा व्हावे'

अशी अपेक्षा बोलून दाखवतो. या 'तरलते'च्या सामर्थ्यावर–

सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावें
प्रीति–सारिका गीत तियेचें ऐकावें कानीं
बनवावे मन धुंद रंगुनी काव्यसुधापानी

अशा उत्कट मनीषा कवी जोपासतो.

या 'द्वंद्वां'च्या साम्राज्यात निखळ आनंददायक अभिलाषा तृप्त होणे अशक्यप्राय असते. त्यामुळे प्रखर निराशा कवीला साफ कोलमडून टाकते–कवीचे सारे भावजीवनच उद्‌ध्वस्त होते–

भवदुःखाच्या अनंत डोहीं परि बुडतों पाही;
शांति मिळेना, क्षणभर जीवा विश्रांती नाही.

अशी त्याची शोकाकुल अवस्था होते. या कवितेतील प्रारंभीचा बालविहग भुर्रकन उडून जातो. अन् कवीची अशांतीच वाचकाला अस्वस्थ करून सोडते. त्यांचा 'पारवा' तर मूर्तिमंत उध्वस्ततेवर तग धरून कसाबसा जिवंत आहे–

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भिंत खचली, कलथून खांब गेला
जनी पडकी, उध्वस्त धर्मशाला;
तिच्या कौलारीं बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकांतगीत गातो.

—पारव्याकडे बघता बघता कवी आपलाच उजाडपणा, उदासवृत्ती नि एकलेपणा व्यक्त करतो तेव्हा 'पारवा' कवितेतील पारव्याचे चित्र पुसट होत जाते अन् त्याजागी बालकवींचेच असहाय्य, एकाकी नि खिन्न मन दिसू लागते.

'पाखरास' कुणी गाणे गायिले नाही म्हणून कवी नाराज होतो तेव्हाही ते पाखरू म्हणजे कवीचे हळवे मनच होय असे निश्चित जाणवू लागते.

'निःश्वास धावती सौख्यामागे सारे' हे सत्य कवीने अनुभवले आहे. सूर्याची सकाळची कोवळी ऊब प्रसन्न वातावरण निर्माण करते. पण तोच सूर्य प्रखर झाला की सारी सृष्टी मलूल होते—

रविवदनावरचा रंग जरा परि बदले,
मग गान, सर्व सौंदर्य, सर्व हें थिजलें !

इतिकूल परिस्थिती येताच सारे कसे थिजून जाते; गोठून जाते, गारठून निर्जीव होते ते कवी मोजक्या शब्दात दृग्गोचर करतो.

एकीकडे सारे जग सुखात मश्गूल असते तेव्हा कवी आपल्या मनपाखराला म्हणतो—

जग समाधिस्थ जणु, सर्व सर्व हे होते,
परि शांतिलेशही, नव्हता ठाऊक तूंते !
वैसून कुठे तरि, काटेरी झुडुपात
तव हूं–हूं–हूं–चे होते गीत वहात !

—एखादी दुखरी जखम चिघळत असावी तसे कवीच्या पाखराचे केविलवाणे आक्रंदन 'हूं–हूं'च्या गीताद्वारा 'वाहत होते'—जगात पसरत होते. एकाकी दुःखाचे–औदासीन्याचे अतिशय प्रभावी असे 'पाखरूचित्र' ते रेखाटतात. अशा आत्यंतिक दुःखातून सुटण्याचा एकच मार्ग असतो. मृत्यू ! या दुःखाने मरणाची आस जागवली जाते अन् कवी आपल्या 'पाखरास' म्हणतो—

येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.
फिरवून भरारा गोफण तो झाडील
काट्यावर उपडे भग्न हृदय पाडील !
मग एकच धडकी, एकच अंतिम बोल
बोलून तुझे हे जळते हृदय निवेल !

—जनसामान्यांना रिझविणारे पाखराचे गीत कवीचे स्वतःचेच शोकगीत ठरले आहे. शेलीच्या "Our sweetest songs are those that tell us of the saddest thought". या वचनानुसार ते विलक्षण हृद्य वठले आहे.

समासोक्ती अलंकाराने अलंकृत झालेल्या त्यांच्या प्रारंभिक निसर्ग–कवितांमध्ये अशा प्रतीकात्मक कवितांत आढळणारी दाट अनुभूती अनुभवाला येत नाही. कवीचा एखादाच घन भाव–एखाद्याच प्रतीकात जणू सारा प्राण ओतून व्यक्त होत असल्याचे त्यांच्या प्रतीकात्मक कवितांत जाणवते.

केवळ औदासीन्य

'उदासीनते'सारख्या कवितेत तर कवी प्रतीकाचेही पांघरूण झुगारून देतो. एकच एक भावसंवेदना कवीला कुरतडत आहे. वेदना असह्य होत आहे म्हणूनच वेदनेचे शब्दचित्र कमालीचे बोलके वठले आहे. यात निखळ आशयच मध्यवर्ती आहे आणि सर्वव्यापीही. त्यामुळे अलंकरणाला वाव नाही—

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला
काय बोंचते समजेना
हृदयाच्या अंतर्दृयाला.

प्रत्येकाच्याच भेटीला केव्हाना केव्हा तरी येणाऱ्या या जीवघेण्या उदासीनतेला कवी उदासीनतेच्याच स्वतःच्या रूपात उभे करतो. कवीचे उदास झपाटलेपण साध्याच शब्दयोजनेतून वाचकांनाही तेवढेच झपाटून टाकते—

मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला.
आणि हे मुके बोल
तीव्र वेदना करिती. परि ती
दिव्य औषधी कसली त्याला ?

या प्रश्नार्थक अखेरीने ही कविता अधिक परिणामकारक झाली आहे.

कवीचा 'शून्य मनाचा घुमट...' केवढा तरी भयंकर नाद निर्माण करून कवीला बावरून सोडतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवनाची निरर्थकता कवीच्या मनात अखंड घुमत राहते आणि मग कवीला पुन्हा प्रश्न पडतो—

न कळे असला,
घुमट बनविला,
कुणीं कशाला ?—

'उदासीनते 'च्या प्रश्नाप्रमाणेच याही प्रश्नाला उत्तर नाही. वाचकाला निरुत्तर करणाऱ्या या निरलंकृत कविता कमालीच्या प्रभावी ठरलेल्या आहेत.

भावकवी

'बालकवींचे काव्य म्हणजे मंद वाऱ्याच्या झुळकी, तारका व हिरवळ ' जसे डॉ. रा. शं. वाळिंबे म्हणतात. पण या गोष्टी त्यांच्या काव्यात केवळ मखमली पडद्यासारख्या आहेत. त्या पडद्याआड प्रारंभी मानवी जगत आहे. मानवी भावसृष्टी आहे. त्या भावसृष्टीत राजे आहेत, राण्या आहेत, 'होशियार निगा रखो' म्हणणारे सरदार आहेत. प्रेमी युगुले आहेत. जिवाभावाच्या मैत्रिणी आहेत. राजपुत्र आहेत. राजकन्या आहेत. मुग्ध बालिका आहेत. त्यांचे नाचगाणे आहे. झिम्म्याचा खेळ आहे. लपंडाव आहे. बालिकांचे लटके लाजणे, मुरडणे संकोचणेही आहे. या रम्य भावविश्वानंतर कवीचे हताश सुस्कारे काही पाखरांना पुढे करून व्यक्त झाले आहेत. कवीची उदास खिन्नता समर्थ प्रतीकातून त्याने उभी केली आहे. पाखरास उद्देशून बालकवींनी जवळजवळ सात गाणी लिहिली आहेत. त्यातील विषण्ण सूर रसिकमनाचा थरकाप करणारा आहे.

बालकवींच्या कवितांतील निसर्गचित्रणापेक्षा त्यांच्या प्रतीकात्मक कवितांतून आपणाला त्यांच्या अंतर्हृदयात शिरण्याचा परवाना मिळतो. या प्रतीकात्मक कवितांपेक्षाही बालकवीचे सामग्र्याने नि स्पष्ट दर्शन जर कुठे होत असेल तर ते 'निराशा', 'उदासीनता', 'शून्य मनाचा घुमट' यांसारख्या त्यांच्या आशयघन कवितांत. येथे निसर्ग नाही, प्रतीकयोजनाहीं नाही. जी आहे ती केवळ कवीचा अंतर्गत दाट भाव, साकळलेली निखळ अनुभूती ! निसर्गाचे आवरण नाही की प्रतीकाचे निमित्त नाही. थेट हृदयाच्या अंतर्हृयातून निघालेल्या या ओळी वाचकांच्या अंतर्हृदयात जागा पटकावतात. नेमकी भावानुभूती उत्स्फूर्त वेचक शब्दात येथे व्यक्त झाली आहे. त्यामुळे या मोजक्याच कवितांचे वजन बालकवींच्या इतर कवितांच्या मानाने एकदम वाढले आहे. त्या अधिक परिणामकारक ठरल्या आहेत. त्यांच्या याच कवितांत जातिवंत अस्सल जिवंत काव्याचा अनुभव येतो. आणि मग बालकवी केवळ निसर्गकवी नसून एक अव्वल दर्जाचे उत्कृष्ट भावकवीच आहेत असे म्हणावेसे वाटते. कारण त्यांच्या औदासीन्यविषयक कवितांतून, प्रतीकात्मक कवितांतून आणि निसर्गाधिष्ठित कवितांतूनदेखील केवळ संवेदनक्षम अंतःकरणाच्याच व्यापक आणि सखोल खळबळीचे गोड आविष्करण प्रतीत होते.

□ □

युगवाणीच्या वर्गणीदारांना सूचना

ज्यांची वर्गणी संपली आहे अशा वर्गणीदारांनी कृपया पुढील वर्षीची वर्गणी त्वरित पाठवून 'युगवाणी' वरचा लोभ कायम ठेवावा ही विनंती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. कविवर्य वा. ना. देशपांडे

समीक्षक, संशोधक आणि व्यासंगी पांडित्याबद्दल ख्यातनाम असलेले कविवर्य वामन नारायण देशपांडे यांच्या मृत्यूने एक प्रतिमा आणि पांडित्य असलेले सव्यसाची व्यक्तित्व दृष्टिआड झाले हे मराठी साहित्याचे केवढे दुर्दैव ! २७ फेब्रुवारीला ही अत्यंत खेदजनक घटना घडली. त्यांच्या महाप्रस्थानामुळे तर विदर्भाच्या भरीव आणि गंभीर साहित्यनिर्मितीप्रक्रियेत एक पोकळी निर्माण झाली आहे. 'आराधना', 'कोरकू', 'अनामिका', 'उत्तरायण;' 'पिकासोचे कबूतर' आणि 'विसर्जन' हे त्यांचे सहा काव्यसंग्रह. कल्पकता हा त्यांचा काव्य विशेष. सामान्य विषयात त्यांचे कविमन रमले नाही. दिव्य-भव्य सौंदर्याचे ते भोक्ते. प्रतिभागुणाने भरगच्च अशा त्यांच्या 'भारती', 'सोहागरात' इत्यादि कविता तर आहेतच पण ते एक साक्षेपी प्रयोगी कवि होते व शुद्धता व नीटनेटकेपणा हा त्यांचा स्वभावधर्म होता.

'युगवाणी' हे मासिकाचे नामकरण त्यांनीच केले. त्यातही त्यांची उत्तुंगता दिसून येते. 'युगवाणी' मासिकाचे ते पहिले संपादक. त्यांच्या संपादनकालात 'युगवाणी'ने केलेले कार्य मोठे गौरवान्वित ठरले. "Bee" या प्रतिभासंपन्न कवीला त्यांनी फार मोठ्या प्रमाणात प्रकाशित केले व त्यांना महाराष्ट्राने त्यांचे यथोचित स्थान दिले. 'युगवाणी'चे पितृपद ज्यांचेकडे आहे, त्यांचे निधन तिला किती दुःखद झाले असेल हे सांगितलेच पाहिजे असे नाही. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखशोकात 'युगवाणी' सहभागी आहे.

◻ ◻

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क. प्रा. कृ. व्यं. पेशकार

२५ डिसेंबर १९७४ रोजी साहित्य सम्मेलनाला निघालेले साहित्याचे वारकरी प्रा. कृ. व्यं. पेशकार ह्यांचे वाटेतच देहावसान झाले. एक निगर्वी पण अबोल आणि म्हणूनच जनतेपासून सदा दूर राहणारा पण जनतेबद्दल मनातून नितांत कळकळ व प्रेम उरात बाळगणारा एक साहित्याचा उपासक त्यादिवशी अचानक इहलोक सोडून गेला. विद्यार्थ्यांबद्दल आप्पासाहेबांना अत्यंत प्रेम व जिव्हाळा पण स्वभाव करडा व रूपही त्याला साथ देणारे त्यामुळे विद्यार्थ्यांना मात्र त्यांचे बद्दल आदरयुक्त भय वाटे. आपल्या विषयांत तरबेज व शिकवण्यात वाकबगार म्हणून त्यांचा विद्यार्थ्यांत लौकिक होता. अमरावती नगर-वाचनालयाशी उपाध्यक्ष म्हणून त्यांचा बरीच वर्षे संबंध होता. ते विदर्भ साहित्य संघाशीही संबंधीत होते. विदर्भ साहित्य संघ त्यांच्या प्रेमळ सहकार्याला मुकल्याबद्दल हळहळ व त्यांच्या कुटुंबीयांप्रती आपली हार्दिक शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

□ □

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त

१६ डिसेंबर ७४ ते ४ मार्च १९७५

गो. स. वेहाडराव,
सरचिटणीस

कार्यकारी मंडळाची सभा

कार्यकारी मंडळाची सहावी सभा दि. ९–२–७५ ला सकाळी झाली. प्रा. वसंत वऱ्हाडपांडे यांनी का. का. मंडळाच्या सदस्यत्वाचा आणि युगवाणी संपादकपदाचा राजीनामा दिला होता. या रिकाम्या झालेल्या जागी डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर यांची अविरोध निवड झाली.

कविभूषण श्री. ब. ग. उपाध्य अण्णासाहेब खापर्डे यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या जागी वि. सा. संघ घटना कलम १३ प्रमाणे अध्यक्षांनी डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यांची दि. ७–२–७५ रोजी नियुक्ती केली.

कार्यकारी मंडळाची विशेष सभा दि. ९–२–७५ रोजी सायंकाळी ४ वाजता झाली. श्री. बाबुराव चिमोटे यांनी हिशेब चौकशी समितीच्या प्रतिवृत्तासंबंधी लेखी निवेदन देण्यास नकार दिल्याने त्यांच्या विनंती-प्रमाणे त्यांना तोंडी निवेदन देण्याची संधी दिली होती. त्याप्रमाणे श्री. चिमोटे यांनी केवळ २–३ मुद्यांसंबंधी त्रोटक माहिती दिली व सप्रे प्रकरणासंबंधी लेखी निवेदन देण्याचे मान्य केले, परंतु आजतागायत ते दिले नाही.

या संबंधात दि. २८–२–७५ च्या 'लोकमत' ह्या दैनिकांत त्या पत्राच्या प्रतिनिधीने दिलेली बातमी निराधार, अतिरंजित व खोडसाळ आहे. त्यांत काहीच तथ्यांश नाही.

विश्वस्त मंडळ

विश्वस्त मंडळाची तिसरी सभा दि. ८–२–७५ रोजी झाली. विं. सा. संघ व धनवटे रंगमंदिर येथे होत असलेल्या दुरुस्तींचा व कार्याचा आढावा घेण्यात आला.

सन्मान व सत्कार

दि. २८ डिसेंबर ७४ रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक, पत्रकार व वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. उपाध्य भाऊसाहेब माडखोलकर यांना त्यांच्या अमृत महोत्सवी वर्धापनदिनानिमित्त त्यांचे निवासस्थानी जाऊन पुष्पमाला अर्पण करून त्यांचे संघातर्फे अभीष्टचिंतन करण्यात आले.

दि. २५ फेब्रुवारी ७५ रोजी उमरखेड येथे भरणाऱ्या वि. सा. संघाच्या ३१ व्या साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. शरच्चंद्र टोंगो यांचा संघातर्फे प्रकट सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संमेलनाचे स्वागता-ध्यक्ष श्री. व. ना. एकबोटे व कार्याध्यक्ष श्री. स. वा. नरवाडे यांचाही सत्कार करण्यात आला. सर्वश्री प्रा. गोविंदराव देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. म. श्री. पंडित, श्री. त्रि. गो. देशमुख व श्री. अरविंद जागीरदार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांची त्यांच्या गुणवर्णनपर भाषणे झाली. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे (कवी अनिल) होते, व त्यांनी आभाराचे भाषण केले.

संघाचा वर्धापन दिन

दि. १४ जानेवारी ७५ रोजी वि. सा. संघाचा ५२ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी 'रुक्मिणी स्वयंवर' या संशोधनपर प्रबंधाचे लेखक श्री. सुरेश डोळके यांचा त्यांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला व मराठीचे सुप्रसिद्ध लेखक श्री. वि. स. खांडेकर, हिन्दीचे सुप्रसिद्ध लेखक श्री. जैनेंद्रकुमार यांची समारंभाचे प्रसंगी उपस्थिती हे समारंभाचे वैशिष्टय होते. या दोन्हीही मान्यवर साहित्यिकांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे वेळी कविवर्य रेंदाळकर यांच्या निपाणी येथील सौ. आशावती काटकोळ ह्यांनी संघास भेट म्हणून आणून दिलेल्या छायाचित्राचे अनावरण श्री. खांडेकर यांच्या हस्ते करण्यात येऊन श्री. भ. श्री. पंडित यांनी कविवर्य रेंदाळकरांच्या कवितेसंबंधी भाषण केले.

कै. इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्वस्पर्धा

दि. १९ जानेवारी ७५ रोजी कै. इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय 'माझा आवडता साहित्यिक' असा होता. स्पर्धेत यावर्षी २२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कु. शुभांगी सावरे (लोकांची शाळा, नागपूर) या विद्यार्थिनीस रु. ५१ चे पहिल्या क्रमांकाचे रोख पारितोषिक मिळाले. रु. ३१ आणि रु. २१ रु. ची रोख पारितोषिके अनुक्रमे कु. अमिता पातुरकर (सोमलवार उच्च शाळा) व कु. विनीता साने (भिडे कन्या शाळा) यांना मिळाले. सर्वश्री दिनकर देशपांडे, अंबादास देवळे व चंद्रकांत कुळकर्णी यांनी परीक्षक म्हणून काम केले.

गडकरी स्मृतिदिन

दि. २३ जानेवारी ७५ रोजी सकाळी संघाच्या कार्यकर्त्यांनी सावनेर येथील गडकरी स्मृतिसमाधीला पुष्पहार अर्पण केला. सायंकाळी ६ वाजता वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात डॅ. पी. एन. कारेकर यांचे "गडकरी आणि त्यांचे वाङमय" या विषयावर व्याख्यान झाले.

श्री. गो. नी. दांडेकर यांचे व्याख्यान

दि. १८ जानेवारी रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गो. नी. दांडेकर यांचे 'माझ्या साहित्यिक प्रेरणा' या विषयावर व्याख्यान झाले.

दु:खद घटना शोकसभा

अमरावती महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक व वि. सा. संघाच्या पूर्वीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. कृष्णाजी व्यंकटेश पेशकार यांचे इचलकरंजी साहित्य संमेलनाला जात असता प्रवासातच निधन झाले. दि. २९–१२–७४ रोजी वि. सा. संघातर्फे शोकसभा घेण्यात येऊन त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

वि. सा. संघाचे सभासद व नागपूर आकाशवाणीचे प्रमुख कलाकार श्री. विनय डांगरे यांचे निधन झाले. त्यांना वि. सा. संघातर्फे दि. ९–२–७५ रोजी भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

मराठीतील सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी, टीकाकार महानुभाव वाङमयाचे संशोधक व संघाच्या 'युगवाणी' मासिकाचे आद्य संपादक श्री. वामन नारायण देशपांडे यांचे दि. २७–२–७५ रोजी निधन झाले. दि. १ मार्च रोजी सायंकाळी संघातर्फे प्रकट शोकसभा घेण्यात आली. सभेत डॉ. वि. भि. कोलते, प्रा. भ. श्री. पंडित,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. या. मु. पाठक, प्रा. म. रा. जोशी, गो. स. देहाडराय यांनी त्यांचे गुणवर्णनपर भाषणे करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे यांनी आपली श्रद्धांजली अर्पण केली व संस्थेतर्फे दुखवटयाचा ठराव वाचून दाखविला. सर्व उपस्थितांनी उभे राहून मूक श्रद्धांजली वाहिली.

श्री शिवछत्रपती प्रदर्शन

श्रीशिवाजी राज्यारोहण त्रिशतसांवत्सरिक वर्षानिमित्त येथील परिमल प्रकाशन व वि. सा. संघ यांच्या संयुक्त योजनेने श्रीशिवछत्रपती दर्शन दि. १० जानेवारी ते १५ जानेवारीपर्यंत आयोजित करण्यात आले.

संगीत व चित्रकला समिती

संघाच्या संगीत केंद्र (स्वरमंडळ) या शाखेने दिल्ली, जयपूर, पुणे येथील आकाशवाणीचे प्रमुख कलाकार पं. भास्करण शर्मा, पं. पद्माकर बर्वे, पं. मधुकरराव गोळवलकर व श्री. राम हर्षे यांचा संगीत व वाद्यवादनाचा बहारदार कार्यक्रम दि. ११ जानेवारी ७५ रोजी सायंकाळी गडकरी सभागृहात आयोजित केला होता. सभागृह गानरसिकांनी संपूर्ण फुलून गेलेले होते. या संगीत व वाद्यवादनाला श्री. संपतलाल व श्री. गोपाळराव वाडेगांवकर यांनी तबल्याची व श्री. मधुसूदन भावे यांनी हार्मोनियमची साथ केली होती.

नाटच समिती

दि. २९-१२-७४ रोजी 'घरआंगण' या उपक्रमात प्रा. ज. रा. फणसळकरकृत 'दुबळी झोळी' ही एकांकिका स्वावलंबी संस्थेने सादर केली.

नाटचसमितीच्या विद्यमाने विविध नाटचस्पर्धेचा एक भाग म्हणून आयोजित केलेल्या बालनाटचस्पर्धेत नाटचगंगा, नागपूर या संस्थेने सादर केलेल्या 'परी आली भुरंकन' या नाटचप्रयोगाला प्रथम क्रमांकाचे रोख रु.५० चे पारितोषिक देण्यात आले. रंजन कला मंदिरातर्फे फिरता रौप्य चषकही त्याच संस्थेने मिळविला. या स्पर्धेतील द्वितीय क्रमांकाचे रोख रु. ३० चे पारितोषिक 'कलातरंग' या संस्थेने सादर केलेल्या 'जंगलातील वेताळ' या नाटचप्रयोगाला व तृतीय क्रमांकाचे रु. २० चे पारितोषिक 'नीलसागरललित कलाभुवन' या संस्थेने सादर केलेल्या 'काका सांगा कुणाचे' या नाटकाला देण्यात आले. उत्कृष्ट वैयक्तिक अभिनयाचे रु. १५ व रु. १० चे पारितोषिके पुढील मुलामुलींना देण्यात आली आहेत :

प्रथम क्रमांकाचे रु. १५ चे श्री. विकास जैनाबादकर (परि आली भुरंकन), द्वितीय क्रमांकाचे रु. १० चे श्री. सुनील पानसे (जंगलातील वेताळ) तसेच मुलींमध्ये प्रथम क्रमांकाचे रु. १५ चे कु. अंजली सरवटे (परि आली भुरंकन) व द्वितीय क्रमांकाचे रु. १० चे कु. शुभांगी महाजन (परि आली भुरंकन).

परीक्षक म्हणून सौ. कुमुद पाठक, सौ. आशाताई कुळकर्णी व सौ. विजया बनहट्टी यांनी काम केले. ह्या स्पर्धा दि. ८, ९, १५ व १६ फेब्रुवारी ७५ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या.

कै. पद्माकर डावरे एकांकिका

या स्पर्धेत पंधरा नाटचसंस्थांनी भाग घेतला. त्यातील 'कलातरंग' या संस्थेने 'हुतुतू' ही एकांकी उत्कृष्ट रीतीने सादर करून प्रथम क्रमांक पटकाविला व फिरती ढाल आणि रु. ५० चे रोख पारितोषिक मिळविले. सुभाष मंडळा'ने सादर केलेल्या 'प्लॅटफॉर्म' या एकांकी प्रयोगाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. वैयक्तिक अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक 'हुतुतू' एकांकीतील श्री. गजानन सगदेव, द्वितीय क्रमांकाचे अटेन्शन प्लीज 'मधील श्री. सदानंद बोक्षे व तृतीय क्रमांकाचे 'रॅगिंग 'मधील श्री. श्रीकांत वोरकर यांना मिळाले. सर्वश्री राजा पाठक, आनंद जोग व अरविंद पाठक यांनी परीक्षकाचे काम केले. या स्पर्धा दि. ११,१२,१३ व १४ फेब्रु. ७५ रोजी झाल्या.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. खोलकुटे आंतरमहाविद्यालयीन ढाल नाट्यस्पर्धा

महाविद्यालयासाठी श्री. खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत विश्वेश्वरय्या रीजनल अभियांत्रिकी महाविद्यालय या संस्थेच्या 'राजरक्त' या नाटकाचा प्रथम क्रमांक येऊन, त्यांनी फिरती खोलकुटे ढाल पटकाविली. या स्पर्धेत पुरुष भूमिकेचे वैयक्तिक अभिनयाचे पारितोषिक रु. १५ चे श्री. प्रदीप शिंगारे, मेडिकल कॉलेज नागपूर तर्फे सादर केलेल्या 'झोपी गेलेला जागा झाला' यांना व स्त्री भूमिकेचे रु. १५ चे वैयक्तिक अभिनयाचे. परितोषिक विश्वेश्वरय्या रीजनल अभियांत्रिकी महाविद्यालय या याच्या 'राजरक्त' नाटकांतील कु. विद्या आमलेकर यांना मिळाले.

सर्वश्री राजा पाठक, प्रा. ज. रा. फणसाळकर व कु. पुष्पा भोळे हे परीक्षक होते.

सन्मानीयांच्या भेटी

दि ११-२-७५ रोजी श्री. ए. अहमद व श्री. रमेश मंत्री ह्या युनायटेड स्टेटस इन्फरमेशन सर्व्हिसच्या कार्यकर्त्यांनी वि. सा. संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला भेट दिली.

स्मृतिदिन

दि. ३०-१-७५ ह्या दिवशी पूज्य महात्मा गांधी ह्यांच्या चित्राला पुष्पमाला अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

नवीन आजीव सभासद

श्री. रमेश मुलगुंद, दिल्ली.

परीक्षा समिती

विदर्भ साहित्य संघाच्या फेब्रुवारी १९७५ ह्या सत्रातील परीक्षा दि. १ व २ फेब्रुवारी ७५ ला झाल्या. ह्या सत्रात एकूण १९०० परीक्षार्थी होते. त्यापैकी शालेय १०९५; महाविद्यालयीन ६६५ आणि शासकीय १४० परीक्षार्थी होते.

'साहित्य पारंगत' (एम. ए. समकक्ष) या उच्चतर पदवी परीक्षेस एकूण २० परीक्षार्थी सम्मीलित झाले. त्यात सौ. उषा रत्नाकरराव लाखे यांनी गुणानुक्रमे प्रथम क्रमांक मिळविला. त्याप्रीत्यर्थ त्यांना 'शिंगणापूरकर' सुवर्ण पदक प्रदान करण्यात येईल. ऑगस्ट १९७४ च्या सत्रातील 'साहित्य विनीत' माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शालान्त परीक्षेशी समकक्ष या परीक्षेत श्री: विजय वसंतराव खाडे (केन्द्र, प्रभात सार्वजनिक वाचनालय, बिरुळ) यांनी गुणानुक्रमे प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल व फेब्रुवारी ७५ च्या सत्रात कु. वंदना दामोदर कुस्ता (केन्द्र: कै. दादासाहेब धनवटे नगर विद्यालय) यांनी गुणानुक्रमे प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल, श्री. दिवाणजी पारितोषिक रोख रु. १५ प्रदान करण्यात येईल.

शाखा वृत्त

दारव्हा शाखा

वि. सा. संघ, दारव्हा शाखेतर्फे खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

११-१२-७४	'ज्ञानेश्वर पुण्यतिथी' वक्ते प्रा. भा. रा. कुळकर्णी.
२५-१२-७४	'गीता जयंती' गीता पठन व ॲड. प्र. मा. देशपांडे यांचे व्याख्यान.
२३-१-७५	'गडकरी स्मृतिदिन'.
२९, ३० व ३१ जाने. ७५	इतिहास संशोधक श्री. बाबासाहेब ठकार यांची 'श्रीशिवाजी' व 'संभाजी' या विषयावर तीन व्याख्याने.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उमरेड शाखा

उमरखेड, जि. यवतमाळ येथे वि. सा. संघाची शाखा ८ जाने. ७५ रोजी स्थापन झाली. खालील सभासदांची विविध पदांवर निवड झाली.

अध्यक्ष–श्री. स. वा. नरवाडे. उपाध्यक्ष–श्री. वि. ए. तिवारी. सचिव–श्री. अ. गो. साकळे. सहसचिव–श्री. दत्तोपंत जोशी. कोषाध्यक्ष–श्री. भि. स. कलंत्री. सभासद–सर्वश्री गं. रं. वानेरे, बाळासाहेब देशमुख (पाटील), सौ. अरुंधती पोटे, मधुकरराव आडे, बा. दा. जोशी, रा. कृ. कुळकर्णी आणि अ. कृ. पांडे.

यवतमाळ शाखा

दि. २५ डिसेंबर ७५ रोजी साधारण सभा होऊन खालील पदाधिकाऱ्यांची निवड झाली.

अध्यक्ष–श्री. ब. ना. एकबोटे. उपाध्यक्ष–सौ.आशाताई बर्वे. कार्यवाह–श्री. गोविंद देशपांडे. सहकार्यवाह–श्री. शरद पिदडी. कोषाध्यक्ष–श्री. नी. सी. दीक्षित. सभासद–सर्वश्री शरच्चंद्र टोंगो, गो. वा. पंडित, सौ. मंगलाताई श्रीखंडे, वि. रा. श्रीखंडे, सौ. सुशिलाबाई पंडित, द. वा. महाजन, दि. ग. बोधनकर, सुधाकरराव नाईक, रा. ना. बर्वे, सौ. निर्मलाबाई कोठारी, ना. सु. नंदूरकर, राजाभाऊ गोरे, रमेश तारगावकर, नीलकृष्ण देशपांडे.

या शाखेतर्फे खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

२६–१२–७४ श्री. नरहर कुरुंदकर यांचे ' कर्म ' या विषयावर व्याख्यान.

१७–१–७५ श्री. वि. रा. श्रीखंडे व सौ. मंगलाताई श्रीखंडे यांची त्यांनी केलेल्या अमेरिका प्रवासावर डॉ. गो. वा. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली भाषणे.

१६–२–७५ वि. सा. संघाच्या, उमरखेड येथे होणाऱ्या ३१ व्या साहित्य संमेलनाचे नियोजन अध्यक्ष श्री. शरच्चंद्र टोंगो यांचा श्री. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार.

इतर शाखांची कार्यवृत्ते ह्या कार्यवृत्ताच्या कालात आली नाहीत. □ □

' युगवाणी ' मासिकासंबंधी माहिती

१. प्रकाशन स्थळ	विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर १२.
२. प्रसिद्धीचा नियतकाल	मासिक निघतात परंतु जोड अंक.
३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता	मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, भारतीय, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर–१२.
४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता	गो. स. देहाडराय. भारतीय, सरचिटणीस वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर–१२.
५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व पत्ता	डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर, भारतीय, वि. सा. संघ झाशी राणी चौक, नागपूर १२.
६. वृत्तपत्राची मालकी	विदर्भ साहित्य संघ, नागपूर १२.

मी, गोपाळ सदाशिव देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ जाहीर करतो की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुती प्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

गो. स. देहाडराय,
प्रकाशक
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर १२.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मौज प्रकाशन गृह : रौप्यमहोत्सवी वर्ष

नवी प्रकाशने

गंधरेखा | **पुरुषोत्तम शिवराम रेगे**

'रात्र असावी', 'त्रिधा राधा', 'पाहिलें न पाहिलें' इत्यादी पन्नास कविता. दुसरी आवृत्ती.

पृष्ठे क्राउन ७२ ☐ किंमत सात रुपये

श्री० ना० पेंडसे : लेखक आणि माणूस | **एक मित्र**

मराठीतल्या आजच्या श्रेष्ठ कादंबरीकाराचे चरित्र, व्यक्तित्व आणि साहित्य यांचे सांगोपांग दर्शन.

पृष्ठे रॉयल ४७२ ☐ किंमत पंचावन्न रुपये

राजा लिअर | **शेक्सपिअर; भाषांतर : विंदा करंदीकर**

जागतिक साहित्यातील एका अभिजात नाट्यकृतीचे मुक्तछंदातील भाषांतर. प्रदीर्घ विवेचक प्रस्तावना, विपुल टीपा आणि पाच परिशिष्टे.

पृष्ठे डेमी २८० ☐ किंमत वीस रुपये

सात सक्कं त्रेचाळीस | **किरण नगरकर**

जीवनातील असंबद्धतेचा सच्चेपणाने आणि धैर्याने शोध घेत जाणारी नव्या लेखकाची कादंबरी

पृष्ठे डेमी २०८ ☐ किंमत एकवीस रुपये

तपशीलवार मोफत सूचीसाठी कार्ड टाका :

मौज प्रकाशन गृह,

खटाववाडी, मुंबई ४०० ००४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ युगवाणी ॥

जून–जुलै १९७४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ : श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय

वरील ग्रंथालयासाठी पुढील गोष्टींची आवश्यकता आहे—

१. युगवाणीचे आरंभापासून १९५० पर्यंतचे सुटे वा बांधलेले अंक.

२. **वागीश्वरी, विहंगम, विश्ववाणी** या नागपुरातील जुन्या नियतकालिकांचे सुटे वा बांधलेले अंक.

३. '**महाराष्ट्र-वाग्विलास**' सारख्या विदर्भातील जुन्या नियतकालिकांचे अंक.

४. सध्या दुर्मिळ असलेले ग्रंथ : उदा० देवनाथ—दयाळनाथ यांची कविता, तुलसी-रामायणाचा जामदारकृत मराठी अनुवाद. त्याचप्रमाणे अन्य संग्राह्य व अभ्यासकांस उपयुक्त होतील असे ग्रंथ.

हे ग्रंथालय समृद्ध व अभ्यासकांस व संशोधकांस उपयुक्त व्हावे यासाठी आपणाजवळील दुर्मिळ अशी साहित्य—संपदा आम्हाला देऊन वि. सा. संघ व श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय यांना उपकृत करावे ही विनंती.

पत्ता : **श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय, विदर्भ साहित्य संघ,** झाशी राणी चौक, नागपूर १२.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका